रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ३१
www.ramprahar.com
शनिवार, १७ ऑगस्ट २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

नवीन पनवेल-विचुंबे पुलाचे काम अंतिम टप्प्यात/३
'संवादप्रहर'मध्ये जलतरणपटू प्रभात कोळीची मुलाखत/६
लम्पी रोगामुळे मुरूडमध्ये वासराचा मृत्यू/७

## उद्धव ठाकरेंच्या मुद्द्याकडे 'मविआ'कडूनच दुर्लक्ष



**मुंबई :** राज्यात सर्वच पक्ष विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. अशातच शुक्रवारी (दि. १६) मुंबईमध्ये महाविकास आघाडीच्या संयुक्त मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला महाविकास आघाडीचे बरेच नेते उपस्थित होते. या वेळी शिवसेना ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाचा मुद्दाही उपस्थित केला. उद्धव ठाकरे हे ज्येष्ठ नेते शरद पवार आणि पृथ्वीराज चव्हाण यांचे नाव घेत म्हणाले की, त्यांनी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण असावा हे जाहीर करावे. यावर महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी काँग्रेसची भूमिका मांडत आपले काम मुख्यमंत्रिपदाचा चेहरा समोर करणे नाही. महाविकास आघाडीचे सर्व नेते एकत्र बसून या संदर्भात निर्णय घेतील, असे स्पष्ट केले, तर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही मुख्यमंत्रिपदाबाबत भाष्य केले नाही. त्यामुळे ठाकरे दुर्लक्षित झाले.

# विरोधकांचा अपप्रचार खोडून काढा

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांना आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

साफ नियत आणि स्पष्ट निती घेऊन भारतीय जनता पक्ष काम करत असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील देशात, तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्याच्या विकासाचा आलेख उंचावत आहे, मात्र विरोधक अपप्रचार करून समाजामध्ये विष पसरविण्याचे काम करत आहेत. तो खोटा, अपप्रचार खोडून काढण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जागरूकपणे काम करावे, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. १६) पनवेल ग्रामीण मंडलाच्या विस्तारित कार्यकारिणी बैठकीत केले.

भाजपच्या पनवेल ग्रामीण मंडल विस्तारित कार्यकारिणीची बैठक पनवेलजवळील आकुर्ली येथील काकाजीनी वाडी येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. त्या वेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

व्यासपीठावर भाजपचे तालुका मंडल अध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस व पनवेल विधानसभा प्रमुख नितीन पाटील, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, एस.के. नाईक, सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्ष कमला देशेकर, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, मागासवर्गीय सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, कार्यालयीन चिटणीस अमरीश मोकल उपस्थित होते. या बैठकीसाठी तालुका पदाधिकारी, विविध मोर्चा, सेलचे पदाधिकारी, माजी जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद व पंचायत समिती विभागीय अध्यक्ष, विविध ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुढे बोलताना सांगितले की, भाजप निवडणूक जिंकण्यासाठी नाही, तर सर्वसामान्य माणसाच्या उत्कर्षासाठी योजना अमलात आणतो या योजना कायम राहण्यासाठी सत्ता आवश्यक असते. त्यामुळे निवडणूक जिंकणे जरूरीचे असते. काँग्रेसच्या काळात योजनांचा लाभ सर्वसामान्य माणसाला मिळत नव्हता. त्या तुरळक आणि फक्त कागदोपत्री असायच्या, परंतु विकासपुरुष नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान म्हणून देशाची सूत्रे हाती घेतल्यापासून सर्व योजनांचे पैसे लाभार्थ्याला थेट त्याच्या बँक खात्यात जमा होऊन पारदर्शकता निर्माण झाली. **(पान २ वर..)**

### धामणी येथील शेकाप, काँग्रेस कार्यकर्ते भाजपत

या वेळी पनवेल तालुक्यातील धामणी येथील शेकाप आणि काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. यामध्ये आत्माराम भस्मा, सखाराम भस्मा, बुधाजी भस्मा, माजी ग्रामपंचायत सदस्य बबन भस्मा, काळुराम भस्मा, बाळू भस्मा, राजा उघडा, सोमा हिंदोळा, गोविंद खंडवी, शनिवार खंडवी, अनंता हिंदोळा, नथुराम खंडवी, हाशा झुगरे, सुरेश मेंगाळ, सखाराम मेंगाळ, कमळ्या द्रुमणा, जानू भस्मा, वसंत खंडवी, मनोहर भस्मा, शंकर भस्मा, गुरूनाथ भस्मा, विजय झुगरे, ज्ञानेश्वर झुगरे, सीताराम द्रुमणा यांचा समावेश आहे. या सर्व प्रवेशकर्त्यांचे मान्यवरांकडून पक्षाची शाल देत भाजपमध्ये स्वागत करण्यात आले.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना

## आणखी १६ लाख भगिनींना सरकारची भेट

### बँक खात्यात तीन हजार रुपये जमा

**मुंबई : प्रतिनिधी**



राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत पात्र महिलांच्या बँक खात्यात पैसे जमा केले जात आहेत. आतापर्यंत ८० लाख महिलांच्या बँक खात्यावर राज्य सरकारने तीन हजार रुपये पाठवले आहेत. असे असतानाच सरकारने आणखी १६ लाख पात्र महिलांच्या बँक खात्यावर हा सन्मान निधी जमा केला आहे.

लाडकी बहीण योजनेच्या लाभ हस्तांतरणाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. आज सकाळपासून १६ लाख ३५ हजार भगिनींच्या खात्यात तीन हजार रुपये लाभ जमा झाला आहे. त्यापूर्वी ८० लाख महिलांच्या खात्यात थेट लाभ हस्तांतरण पूर्ण झाले होते. सद्यस्थितीत एकूण ९६ लाख ३५ हजार महिलांना या योजनेचा लाभ यशस्वीरित्या हस्तांतरित झाला आहे, असे सांगून उर्वरित महिलांनाही लाभ मिळावा यासाठी महिला व बालकल्याण विभाग युद्धपातळीवर कार्यरत आहे, अशी माहिती महिला आणि बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी शुक्रवारी (दि. १६) दिली.

याआधी स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच १४ ऑगस्ट रोजी ३२ लाख महिलांना, तर १५ ऑगस्ट रोजी पहाटे ४ वाजता ४८ लाख महिलांना त्यांच्या बँक खात्यात लाभ हस्तांतरित करण्यात आला. ३१ ऑगस्टनंतरही महिलांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज दाखल करता येणार आहे.

### जम्मू काश्मीर, हरियाणा विधानसभेची निवडणूक जाहीर

**नवी दिल्ली :** जम्मू काश्मीर केंद्रशासित प्रदेश व हरियाणा राज्याच्या विधानसभेची निवडणूक जाहीर झालीय. जम्मू काश्मीरमध्ये १८, २५ सप्टेंबर व १ ऑक्टोबर आणि हरियाणात १ ऑक्टोबरला मतदान होईल; तर सर्व मतमोजणी ४ ऑक्टोबरला आहे.

## भारताची २०४७पर्यंत विकसित देश ओळख होईल -राज्यपाल

**माणगाव : प्रतिनिधी**

भारतामध्ये सेवा क्षेत्रातील नेतृत्वासोबतच जागतिक उत्पादन केंद्र बनण्याची क्षमता आहे. २०४७पर्यंत विकसित भारत ही आपली ओळख असणार आहे. या काळात तरुणांना मोठ्या प्रमाणावर संधी निर्माण होणार आहे. प्रत्येक युवकाने आपले ध्येय निश्चित करावे. कठोर व प्रामाणिक मेहनत आणि सर्वोत्तम सातत्यपूर्ण कामगिरी ही यशस्वी होण्याची गुरूकिल्ली असल्याचे प्रतिपादन राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती सी.पी. राधाकृष्णन यांनी केले. ते शुक्रवारी (दि. १६) माणगाव तालुक्यातील लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या २६व्या दीक्षांत समारंभात बोलत होते.

व्यासपीठावर शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर, राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, जिल्हाधिकारी किशन जावळे, उपमुख्य कार्यकारी डॉ. भरत बास्टेवाड, विद्यापीठ कुलगुरू डॉ. कारभारी काळे, कुलसचिव डॉ. अरविंद किवळेकर, परीक्षा नियंत्रक डॉ. नरेंद्र जाधव आदी होते. **(पान २ वर..)**

### 'आयएमए'चा आज देशव्यापी सेवाबंद संप

**नवी दिल्ली :** कोलकात्यातील डॉक्टर विद्यार्थिनीवर बलात्कार व हत्येच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) ने सेवाबंद संप पुकारला आहे. त्यानुसार शनिवारी (दि. १७) सकाळी ६ ते दुसऱ्या दिवशी सकाळी ६पर्यंत ओपीडी बंद राहिल.



# बचत गटांच्या उत्पादनांना राष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे बैठकीत निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील महिला बचत गट आणि महिला उद्योजकांनी तयार केलेल्या उत्पादनांना राष्ट्रीय स्तरावर बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी आर्टीफिशिअल इंटेलिजन्स आधारीत डिजिटल मार्केटींग ॲप करावे. शहरांमध्ये बचत गटांची संख्या वाढवावी. जिल्हा परिषदेच्या शाळांमधील मैदानांवर सुटीच्या दिवशी बचत गटांसाठी स्टॉलची व्यवस्था करून द्यावी. ग्रामीण भागातील बचत गटांनी उत्पादीत केलेल्या वस्तूंना शहरांमधील बाजारपेठेत उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी (दि.१६) येथे दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे याबाबत बैठक झाली. बैठकीस कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव डॉ. आय. एस. चहल, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह आदी या वेळी उपस्थित होते.



मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, दोन दिवसांपासून राज्यातील महिला भगिनींच्या खात्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची रक्कम जमा होत आहे. काल मी यातील काही भगिनींशी संवाद साधला. त्यांना मिळणारी रक्कम छोट्या व्यवसायासाठी उपयोगात आणणार असल्याचे त्यांच्या बोलण्यातून समजले. त्यामुळे आता महिला भगिनी करीत असलेल्या छोट्या-मोठ्या व्यवसायाला बाजारपेठ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

राज्यात सुमारे सात लाख ८२ हजार बचत गट कार्यरत असून उमेद अंतर्गत सुमारे सहा लाख, एनयुएलएम अंतर्गत ३१ हजार, माविम अंतर्गत ग्रामीण ८७ हजार आणि शहरी ६५ हजार असे बचत गट कार्यरत आहेत. महानगरांमध्ये बचत गट, महिलांनी उत्पादीत केलेल्या वस्तूंना स्टॉलची उभारणी करण्यासाठी महापालिकांनी पुढाकार घ्यावा. मोकळ्या जागा, मैदाने याठिकाणी काही दिवसांकरीता स्टॉलची उभारणी करून देण्यात यावी. जेणेकरून याठिकाणी हक्काची बाजारपेठ या गटांना मिळेल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

बचत गटांच्या वस्तूंना मोठी मागणी असते. त्याची दखल घेऊन राष्ट्रीय स्तरावरदेखील त्याला बाजारपेठ मिळावी यासाठी उमेद, एनयुएलएम, माविम यांनी एकत्रित येऊन एक व्यासपीठ निर्माण करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

या वेळी धर्मवीर आनंद दिघे महारोजगार पच्या माध्यमातून शासकीय स्तरावर असंघटीत कामगारांचे डिजिटल जॉबकार्ड तयार करण्याची संकल्पना या वेळी सादर करण्यात आली.

# रायगडात रखडलेल्या विकासकामांचा धडाका

## महिनाभरात ५०० विकासकामांना मंजुरी

**अलिबाग : प्रतिनिधी**

नवीन आर्थिक वर्षातील एप्रिल, मे, जून या तीन महिन्यांचा कालावधी आचारसंहितेमध्ये गेले, मात्र आचारसंहिता संपल्यानंतर विकासकामांच्या प्रक्रियेला वेग आला आहे. २०२४-२५ या वर्षासाठी ४३२ कोटींची जिल्हा वार्षिक योजना आराखडा असून यातील जास्तीत जास्त निघी वर्ग व्हावा यासाठी गेल्या महिनाभरात ४०० ते ५०० विकासकामांना मंजुरी देण्यात आल्याची माहिती जिल्हा नियोजन अधिकारी जय मेहेत्रे यांनी दिली आहे.

आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने आपल्या मतदार संघातील कामे मार्गी लावण्याचा धडाका येथील नेतेमंडळीनी घेतला आहे. विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने भूमिपूजनांचे कार्यक्रम गावोगाव होऊ लागले आहेत. काही दिवसांतच लागू होणाऱ्या निवडणुकांच्या आचारसंहितेमुळे जिल्ह्यातील विकासकामांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येथील राजकीय नेते विविध कामे सुचवत असून त्यास जिल्हा नियोजनकडूनही मंजुरी मिळत आहेत.

रायगड जिल्हा नियोजन समितीने मागील दोन वर्षांत जिल्हा वार्षिक योजनेचा १०० टक्के निधी खर्च केला आहे. जिल्हा वार्षिक योजना सन २०२१-२२ या वर्षासाठी २७५ कोटींचा विकास आराखडा मंजूर होता, तर त्यानंतर सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी जिल्ह्यासाठी ३२० कोटींचा जिल्हा वार्षिक योजना आराखड मंजूर होता. सन २०२३-२४ या वर्षात जिल्हा वार्षिक योजनेचा ३६० कोटींचा आराखडा मंजूर आहे. तीनही वर्षात १०० टक्के निधी खर्च करण्यात रायगड जिल्हा प्रशासनाला यश आले आहे. सन २०२४-२५ या वर्षासाठी ४३२ कोटींची जिल्हा वार्षिक योजना आराखडा आहे. यातील जास्तीत जास्त निधी आपल्या मतदार संघात आणण्याचा येथील लोकप्रतिनिधींचा प्रयत्न दिसून येत आहे.

आचारसंहितेमुळे निविदा प्रक्रिया रखडलेल्या निविदा आता उघडण्यास सुरुवात झाली आहे. जुलै महिन्यात आचारसंहिता समाप्त झाली. त्यानंतर सर्व यंत्रणांना निविदा प्रक्रिया राबविण्याच्या सूचना दिल्या आहेत. कार्यारंभ आदेश देण्याची प्रक्रिया करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. सध्या पावसाळ्यामुळे रस्त्यासारखी कामे होत नाही, त्यामुळे पावसाळा संपताच ही कामे सुरू होतील.

**आमदारांनी विविध कामे सूचवली असून त्यातील ४००-५०० कामांना मंजुरी देण्यात आली आहे. त्याची प्रक्रिया सध्या चालू आहे. सर्व योजनांच्या प्रशासकीय मान्यतेचे आदेश द्यावेत व निविदा प्रक्रियाही पूर्ण व्हावी अशा सूचना पालकमंत्री उदय सामंत यांनी दिल्या आहेत. त्यामुळे कार्यारंभ आदेश मिळाल्यानंतर निवडणूक आचारसंहिता लागू झाली तरी विकासकामांना अडचण येणार नाही.**

**-जयसिंग मेहेत्रे,**
**जिल्हा नियोजन अधिकारी, रायगड**

# उरणमध्ये आमदार चषक जलतरण स्पर्धा उत्साहात

**उरण : वार्ताहर**

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून गुरुवार (दि. १५) जिल्हा स्तरीय जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. नगर परिषद, महेश बालदी मित्र मंडळ व हौशी जलतरण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धा उरण नगर परिषदचे बाळासाहेब ठाकरे संकुल विमला तलाव घेण्यात आली.

या स्पर्धेत सुमारे २७०



स्पर्धकांनी भाग घेतला असून एकूण ६१ इवेन्ट झाले. स्पर्धा सहा वर्षांपासून ५० वर्षे वयोगटामध्ये घेण्यात आली. विजेत्या स्पर्धकांना मेडल व सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात आले.

या वेळी आमदार महेश बालदी, उरण शहर भाजप अध्यक्ष तथा माजी नगरसेवक कौशिक शाह, माजी नगरसेवक धनंजय कवडे, भारत पाटील, सुनील पाटील, विनोद रूपचंदानी, लेखा निरीक्षक सुरेश पोसतांडेल, श्रीकांत जाधव, अक्षय सर, विजय सर, हितेश भोईर, समर्थ नाईक, सचिन शिगुत, ओमकार कोळी, संकेत म्हात्रे, प्रीयांषू पाटील, हिमांशू मलबारी, प्रज्ञा मोडखरकर, संतोष पाटील आदींचे सहकार्य मिळाले.

# पनवेलमधून तरुणी बेपत्ता

**पनवेल** : वाढदिवस साजरा करण्यासाठी मैत्रिणीकडे असे सांगून गेली ती अद्याप घरी न परतल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

प्रिया मनुठीया असे या तरुणीचे नाव असून उंची पाच फूट, चेहरा गोल, शरिराने सडपातळ असून अंगात राखाडी पंजाबी ड्रेस, कानात नकली झुमके, पायात पैंजण तसेच काळ्या रंगाची चप्पल आहे. तिला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. या तरुणीबाबत माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे यांच्याशी संपर्क साधावा.

# महापारेषणमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**मुंबई : प्रतिनिधी**

महापारेषणमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सुरुवातीला अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी ध्वजारोहण केले. मानव संसाधन विभागामार्फत कर्मचारी सेवा विनियम या पुस्तिकेच्या द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन डॉ. संजीव कुमार यांच्या हस्ते झाले.

या वेळी महापारेषणचे संचालक (संचलन) सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) अविनाश निंबाळकर, संचालक (वित्त) तृप्ती मुधोळकर, संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) अंजू गुप्ता, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) कैलास कणसे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) मंगेश शिंदे, मुख्य अभियंता जुईली वाघ, पीयूष शर्मा, भूषण बल्लाळ, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील, मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुळकर्णी, उपमहाव्यवस्थापक (मा.सं.) नितीन कांबळे, अभय रोही, राजशिष्टाचार अधिकारी सतिश जाधव, उपमुख्य तपास अधिकारी प्रशांत गोरडे, महेश आंबेकर यांचेसह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## पान १ वरुन

### विरोधकांचा अपप्रचार खोडून काढा

देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर मराठा समाजाला आरक्षण देण्याचे काम झाले. पुढे त्यांनी ते सुप्रीम कोर्टापर्यत टिकवले, मात्र त्याचवेळी उद्धव ठाकरे यांचे सरकार स्थापन झाल्यानंतर आरक्षण टिकवण्यासाठी महाविकास आघाडीने कोर्टात बाजू मांडली नाही. म्हणूनच ते आरक्षण टिकले नाही. एक, दोन अपवाद वगळता कायम काँग्रेस-राष्ट्रवादीची सत्ता राज्यात राहिली आहे. मग अनेक वर्षे सत्ता असतानाही त्यांनी मराठा समाजाला आरक्षण का दिले नाही, असा सवाल उपस्थित करत मराठा आणि ओबीसी सामाजात आरक्षणाच्या मुद्द्यावरून समाजामध्ये विष कालवण्याचे काम महाविकास आघाडी करत असल्याचा आरोपही त्यांनी या वेळी केला.

केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून विविध लोककल्याणकारी योजना अमलात आणल्या गेल्या आहेत. त्या बंद करण्यासाठी नाही तर तहयात सुरू राहण्यासाठी, मात्र या योजनांच्या बाबतीतदेखील सध्या खोटा प्रचार महाविकास आघाडीकडून केला जात आहे. योजना बंद करावी म्हणून काँग्रेस पक्ष न्यायालयात गेला होता असे सांगून योजना लोकांपर्यंत मिळू नयेत यासाठी विरोधक कष्ट घेत आहेत, असेही त्यांनी अधोरेखित केले. भ्रष्टाचार करणारे सरकारवर टीका करत असतात आणि त्याचे जिवंत उदाहरण पनवेलमध्ये कर्नाळा बँकेचे आहे हा धागा पकडून आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले की, शेकापवाले सांगतात खातेदारांचे पैसे मिळवून दिले, मात्र प्रत्यक्षात हे पैसे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाच लाखपर्यंतच्या रकमेला दिल्या गेलेल्या विमा संरक्षण निर्णयातून मिळाले आहेत. असे असतानाही शेकापचे पुढारी गमजा मारतात. मग पाच लाखांवरील ठेवी शेकापने खातेदारांना का परत केल्या नाहीत, असा सवाल आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित केला.

पैशासाठी लोकांनी विवेक पाटीलांकडे फेऱ्या मारल्या. ठेवीदार घरी जायचे, तासन्‌तास बसायचे, मात्र विवेक पाटील त्यांना भेटले नाहीत. जेव्हा खारघरच्या शाखेत खातेदारांनी पैसे घेतल्याशिवाय जाणार नाही असा निर्धार केला त्या वेळी रात्री साडेदहा वाजता ते भेटायला आले आणि मी पैसे खाल्ले असतील तर स्वतःला जाळून घेईन अशी गर्जना विवेक पाटील यांनी केली होती. मुलाला वाचवताना स्वतः पैसे घेतल्याची कबुली विवेक पाटील यांनी दिली आणि तसे शपथपत्रही केले. मग असे असतानाही शेकापवाले उजळ माथ्याने भ्रष्टाचाऱ्याचे बॅनर लावून गमजा मारत आहेत. यावरूनच त्यांची नीती काय आहे ते स्पष्ट होते, असा टोला आमदार प्रशांत ठाकूर यांनी लगावत शेकापच्या खोट्या नीतिमत्तेचा खरपूस समाचार घेतला. समाजाचे हित जपण्याचे काम महायुतीकडून होत आहे, मात्र महाविकास आघाडी अफवांचे पीक आणून लोकांची दिशाभूल करत आहे. संविधान बदलण्याची अफवा विरोधकांनी केली आणि आरक्षण संपणार अशी भीती प्रचारातून घालण्यात आली. अशा प्रकारे लोकसभा निवडणुकीत फेक नरेटिव्ह पसरवून महाविकास आघाडीने जनतेची फसवणूक केली. मुख्य म्हणजे संविधान कधीही बदलले जाणार नाही. त्यामुळे असा कधीही प्रचार झाला तर त्याच्यावर विश्वास ठेवू नका, असे आवाहनही त्यांनी या बैठकीच्या माध्यमातून केले.

या वेळी जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी नवमतदार नोंदणीसंदर्भात आढावा घेतला तसेच उपस्थित पदाधिकाऱ्यांच्याशी संघटनात्मक विषयावर चर्चा करत मार्गदर्शनपर संवाद साधला. तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची हॅट्ट्रिक केल्याबद्दल तसेच तळागाळातील लोकांसाठी काम करणाऱ्या राज्य सरकार आणि आपापल्या मतदारसंघात विकासकामांचा झपाटा करणारे आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला. या ठरावाला राजेंद्र पाटील यांनी सर्वानुमते अनुमोदन दिले. भूपेंद्र पाटील यांनी निधन पावलेल्या व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्याचा शोकप्रस्ताव मांडला. बैठकीचे प्रास्ताविक प्रल्हाद केणी, सूत्रसंचालन अमित जाधव यांनी केले, तर उपस्थितांचे आभार आनंद ढवळे यांनी मानले. या बैठकीत कमला देशेकर यांना महिला मोर्चा तालुकाध्यक्षपदाचे, तर रेश्मा भूपेंद्र माळी यांना गुळसुंदे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्षपदाचे नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

### भारताची २०४७पर्यंत विकसित देश ओळख होईल -राज्यपाल

राज्यपाल राधाकृष्णन म्हणाले, नव्या पिढीने तंत्रज्ञान, संशोधन, विचार आणि अर्थ अंमलबजावणी यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. आज कुशल मनुष्यबळासाठी संपूर्ण जगाचे लक्ष भारताकडे आहे. युवकांना कौशल्याचे आणि नवनिर्मितीचे प्रशिक्षण देऊनच देशाला या संधीचा लाभ घेता येईल. भारताची झपाट्याने होणारी वाढ, लोकसंख्या शास्त्रीय लाभांश आणि जागतिक स्तरावर वाढते महत्त्व यामुळे आजच्या पदवीधरांसाठी अकल्पनीय संधी निर्माण झाल्या आहेत. आपण आपले ध्येय निश्चित करून ध्येयप्राप्तीसाठी प्रामाणिक प्रयत्न करावेत.

आपण राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे विद्यार्थी-केंद्रित धोरण तयार केले असून याचा फायदा निश्चित होणार आहे. यामुळे शिक्षण व्यवस्थेत मोठा बदल होईल. हे नवीन विचार व ऊर्जा निर्माण करून बेरोजगारीच्या समस्येचे निराकरण करेल आणि उद्योजक पर्यावरण प्रणाली तयार करण्यासाठी सहाय्यक होईल, असे सांगून राज्यपालांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांमुळे आपल्या भारताची संस्कृती जिवंत राहिली व तिचे जतन झाले आहे. त्याचप्रमाणे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे देशवासीयांना संविधान मिळाले आहे. महापुरुषांचा आदर्श घेत विद्यार्थ्यांनी त्यांच्या ज्ञानाचा उपयोग करून देशाचे नाव मोठे करावे व अर्थव्यवस्था बळकट करण्यात योगदान द्यावे.

पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर म्हणाले, एखाद्याचा जीवनाचा उद्देश साध्य करण्यासाठी आणि राष्ट्रीय विकासासाठी आत्मसात केलेल्या कौशल्यांचा, ज्ञानाचा वापर आपल्या दैनंदिन आयुष्यात करावा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल विद्यापीठाचे राजदूत या नात्याने संपूर्ण राष्ट्रासाठी भरीव योगदान द्यावे.

उद्योगमंत्री तथा पालकमंत्री उदय सामंत यांनी म्हटले की, आपल्याला देशाला बलशाली बनवायचे आहे. यासाठी प्रत्येक युवकाने आपल्या ज्ञानाचा उपयोग करावा. आपले सामाजिक भान आणि दायित्व कायम लक्षात ठेवावे. मंत्रीमहोदयांनी विद्यापीठाच्या विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य देण्यात येईल, असेही आश्वस्त केले.

महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी विद्यापीठाच्या सक्षमीकरणासाठी शासनाकडून सेवा सुविधा देण्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य केले जाईल, असे सांगितले.

राज्यपाल व मंत्रीमहोदयांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील सुवर्णपदक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव तसेच विद्यावाचस्पती पदवी प्रदान करण्यात आली. समारंभाला विविध शासकीय विभागांचे अधिकारी, कर्मचारी तसेच विद्यापीठातील प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# मुख्यमंत्रिपदावरून उबाठाचे तारे जमी पर- ॲड. आशिष शेलार

**मुंबई : प्रतिनिधी**

आमचाच मुख्यमंत्री.. शपथ कार्यक्रमाला या.. अशा वल्गना करणाऱ्या उबाठा गटाचे तारे जमी पर आ गये, असे महाविकास आघाडीच्या मेळाव्यातील चित्र समोर आले आहेत, तसेच ज्याचे आमदार जास्त त्यांना मुख्यमंत्रीपद हा महायुतीचा फॉम्युला होता, हे सत्यही आज उद्धव ठाकरे बोलून गेले. म्हणजे त्या वेळी ते मुख्यमंत्रीपद मागत होते ते कपोलकल्पित होते, अशी प्रतिक्रीया मुंबई भाजप अध्यक्ष आमदार ॲड. आशिष शेलार यांनी दिली.

महाविकास आघाडीच्या मेळाव्यानंतर माध्यमांनी मुंबई भाजप अध्यक्ष आमदार ॲड. आशिष शेलार यांना विचारले असता ते म्हणाले की, आमचाच महाराष्ट्रात चेहरा, मुख्यमंत्रीपदी पुन्हा उद्धव ठाकरेच अशा वल्गना उबाठाकडून करण्यात येत होत्या. त्यासाठी त्यांनी दिल्ली जाऊन आले तरी मागणी मान्य होत नाही. सिल्व्हर ओकला बैठका झाल्या, तरीही मागणी मान्य झाली नाही त्यामुळे त्यांनी आज हे विधान केले. त्यांच्यातली धुसमूस बाहेर येत असून ही लाथाबुक्यांपर्यंत जाऊ नये, अशी टीपणी आमदार ॲड. आशिष शेलार यांनी केली.

संजय राजाराम राऊत हे तर एवढे रंग बदलतात की, सरडाही आत्महत्या करेल आणि सरड्याच्या कुटुंबाने तक्रार केली तर राऊत यांच्यावर गुन्हा दाखल होईल, असा टोलाही आमदार ॲड. आशिष शेलार यांनी लगावला आहे.

# उरण नगर परिषदेत स्वातंत्र्य दिन समारंभ

**उरण : वार्ताहर**

भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७८वा वर्धापन दिन समारंभानिमित्त गुरुवार (दि. १५) उरण नगर परिषदेचे मुख्याधिकारी समीर जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



या वेळी मुख्याधिकारी समीर जाधव, प्रशासकीय अधिकारी संजय डापसे, प्रशासकीय अधिकारी अनिल जगधनी, लेखा परीक्षक सुरेश पोसतांडेल, बांधकाम अभियंता निखिल ढोरे, आरोग्य निरीक्षक हरेश तेजी, माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, माजी नगरसेवक कौशिक शाह, राजेश ठाकुर, धनंजय कवडे, नंदू लांबे, माजी नगराध्यक्ष परमानंद करगुटकर, चंद्रकांत गायकवाड, संतोष पवार, प्रसाद मांडेलकर कर्मचारी उपस्थित होते. स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांना मुख्याधिकारी समीर जाधव यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लेखा परीक्षक सुरेश पोसतांडेल यांनी केले.

## निवडक

### झोपडपट्टीतील शाळेत स्वातंत्र्य दिन

**उरण** : डाऊर नगर चारफाटा ओएनजीसी रोड झोपडपट्टीतील बालसंस्कार मंदिर लहान मुलांच्या शाळेत



स्वतंत्र भारताचा ७८वा स्वतंत्र्य दिन भाजपचे उरण तालुका चिटणीस रायगड भूषण नरेश म्हात्रे यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवून साजरा करण्यात आला. या वेळी संस्थेचे सचिव रामचंद्र म्हात्रे, शिक्षिका भारती पाटील व झोपडपट्टीतील ग्रामस्थ उपस्थित होते. अचल शिंदे, चंदूशेठ पाटील, शेखर म्हात्रे, रवींद्र म्हात्रे यांनी खाऊचे वाटप करून मुलांचे तोंड गोड केले. विशेष म्हणजे अचल शिंदे व चंदूशेठ पाटील हे गेल्या अनेक वर्षांपासून मुलांना खाऊचे वाटप करीत आहेत.

### गुरूकुल शाळेत स्वातंत्र्य दिन साजरा



**मोहोपाडा** : स्वातंत्र्य दिनानिमित्त श्री स्वामीनारायण आंतरराष्ट्रीय गुरुकुल शाळेत श्रीकृष्णचरणदास स्वामी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी गुरुकुल नवी मुंबईचे संचालक विश्वमंगलदास स्वामी, विरक्तजीवनदास स्वामीजी, ब्रम्हस्वरूपदास स्वामी, निर्वेदजीवनदास स्वामी, ऋषिकेश भगत, शाळेचे मुख्याध्यापक डॉ. पी. हरिबाबू रेड्डी, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. आर्मी, नेव्ही आणि एअरफोर्स यासारखे पोशाख परिधान करून विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर प्रात्यक्षिके सादर केली, तसेच भगतसिंग यांच्या जीवनावर प्रकाश टाकून सर्वांची मने जिंकली. काही विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत व नृत्य करीत सर्वांचे लक्ष वेधले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक प्रशांत इवरे तर आभार प्रदर्शन अभिषेक पांचाळ यांनी मानले.

### सील आश्रमात खाऊचे वाटप

**पनवेल** : स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून गुरुवारी



(दि.१५) पनवेलजवळील सील आश्रम येथील सदस्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. महाराष्ट्र मानवी हक्क आयोगचे अध्यक्ष के.के.तातेड तसेच पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पोवार, आनंदा हरुगडे, महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक कुदळे, हवालदार विकास साळवी, येथील फादर फिलिप्स, माजी उपाध्यक्ष मायनॉरिटी सेल डॉअब्राहम मथाई आदी या वेळी उपस्थित होते.

### नवीन पनवेल आणि विचुंबे, पाली देवदला जोडणाऱ्या पुलाचे काम अंतिम टप्प्यात

# नागरिकांची वाहतूक कोंडीतून होणार सुटका

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल आणि विचुंबे, पाली देवद आदी गावांना जोडणाऱ्या पुलाची गुरुवारी (दि.१५) आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाहणी केली. सध्या या पुलाचे काम अंतिम टप्प्यात असून येथील नागरिकांना वाहतूक कोंडीच्या समस्येतून या पुलामुळे दिलासा मिळणार आहे. येत्या काही महिन्यात हा पूल लोकांच्या सेवेत रुजू होईल.

या पुलाच्या पाहणी वेळी पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी



**आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून पाहणी**

जि. प. सदस्य अमित जाधव, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, विचुंबे सरपंच प्रमोद भिंगारकर, उपसरपंच स्वाती पाटील, माजी उपसरपंच रवींद्र भोईर, विभागीय अध्यक्ष किशोर सुरते, माजी सरपंच बळीराम पाटील, राम म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य अनिल भोईर, बि. डी. पाटील, गाव अध्यक्ष के. सी. पाटील, अनंता गायकवाड, श्रावणी भोईर, आरती गायकवाड, विभूती सुरते, प्रगती गोंधळी, माजी सदस्य प्रमिला म्हात्रे, भाग्यश्री भोईर, अक्षता गायकवाड, ज्योती भोईर, हर्षदा भिंगारकर, अविनाश गायकवाड,डि. के. भोईर, चेतन सुरते, आनंद गोंधळी, श्याम म्हात्रे, जगदीश भोईर, विवेक भोईर, संजीत भिंगारकर, राकेश मोरे, विनोद सावंत, बबन जाधव, गणेश सावंत, अजय जाधव यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

## पनवेल रेल्वे स्टेशनबाहेरील रिक्षांची कोंडी लवकरच सुटणार



**पनवेल : वार्ताहर**

दोन दिवसांपूर्वी खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी पनवेल स्थानकाला भेट देत तिथे सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी केली. त्याच वेळी तिथे होणारी वाहतूक कोंडी, रिक्षा चालकांचा प्रश्न या संदर्भातही समस्या जाणून घेतल्या व शिवसेनेचे महानगरप्रमुख प्रथमेश सोमण व संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना दोनच दिवसांत बैठक घेऊन या विषयात तोडगा काढण्याचे आदेश दिले.

शहरप्रमुख प्रसाद सोनावणे यांनी अनेकदा भेट देऊन येथील प्रश्न प्रथमेश सोमण यांच्या नेतृत्वात उपमानगरप्रमुख महेश सावंत, शहरप्रमुख प्रसाद सोनावणे, स्टेशन मास्तर अग्रवाल, सीआरपीएफच्या बाबर मॅडम, रेल्वे पोलीस निरीक्षक पाडवी, वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील, परिवहन विभागाचे निरीक्षक भाड, काही जागरूक प्रवासी, रिक्षा संघटनांचे पदाधिकारी या सर्वांना एकत्रित करून एक यशस्वी बैठक झाली. त्यामध्ये रेल्वे स्टेशनच्या आतील भागात रिक्षांना पूर्णतः जो मज्जाव केला होता त्याऐवजी आता सिंगल लेनमध्ये साधारण १५ रिक्षा आतमध्ये उभ्या राहतील व बाहेर पडल्यानंतर स्टेशनच्या बाहेर एका बाजूस पुन्हा सिंगल लेनमध्येच उभ्या असलेल्या उर्वरित रिक्षा टप्प्याटप्प्याने आत येतील. शहरातील प्रमुख ठिकाणांचे दरपत्रक निश्चित करून ते तिथे लावण्यात येईल. रिक्षाचालक शक्यतो कोणतेही भाडे नाकारणार नाहीत व प्रवाशांनी मीटर टाकण्याचा आग्रह केल्यास तो ही मान्य करतील.

परमिट नसलेल्या, लायसन्स नसलेल्या, बॅच नसलेल्या रिक्षा व रिक्षाचालक यांच्यावर कारवाई होईल व त्या सर्व रिक्षाचालक सहकार्य करतील. रिक्षा प्रवासाचे दरपत्रक व संबंधित अधिकार्यांचे नंबरही तेथे डिस्प्ले करण्यात येतील. सर्वच संबंधित शासकीय अधिकारी अशा पद्धतीने एका प्रश्नावर एकत्रित आल्याने तेथे उपस्थित प्रवासी, नागरिक, विशेष करून बहुसंख्येने असलेले रिक्षाचालक या सर्वांनीच खाससार श्रीरंग आप्पा बारणे, प्रथमेश सोमण, प्रसाद सोनावणे, महेश सावंत यांसह संपूर्ण शिवसेनेचे एका जटील प्रश्नात हात घालून तो यशस्वीरित्या सोडवण्याच्या दिशेने पाऊल टाकल्याबद्दल अभिनंदन केले.

## दोन वाहनांच्या अपघातात चालकाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

दोन मिक्सरच्या झालेल्या अपघातात चालक रामबरण यादव याचा मृत्यू झाला. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

मिक्सर (एमएच ०४ जेयु ७८९८)वरील चालकाने मिक्सर मुंब्रा-पनवेल हायवे रोडवर नावडे ब्रिज उतारावर पहिल्या लेनवर चालू स्थितीत थांबवला. वाहन थांबवल्यानंतर कोणत्याही प्रकारचे बॅरिगेड न लावल्यामुळे रामबरण यादव हा चालक म्हणून काम करीत असलेला ट्रक (जीजे १६ एयू ४१९२) हा मिक्सरच्या पाठीमागून घुसून अपघात झाला. त्यात रामबरण यादव याला गंभीर दुखापती होऊन त्यात त्याचा मृत्यू झाला. मिक्सरवरील चालकाने जखमीला कोणत्याही प्रकारची वैद्यकीय मदत न करता पळून गेला.

## करंजाडे ग्रामपंचायतीसमोर प्रथमच झाले झेंडावंदन




**पनवेल : प्रतिनिधी**

करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार यांच्या हस्ते गुरुवारी (दि.१५) झेंडावंदन करण्यात आले. ४० वर्षांनंतर ग्रामपंचायत कार्यालयासमोर प्रथमच झेंडावंदन केल्याबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

करंजाडे ग्रामपंचायत १९८३मध्ये स्थापन झाली. ग्रामपंचायत कार्यालयासमोर ध्वजस्तंभ उभारण्यात आला नव्हता. त्यामुळे शेजारी असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये झेंडावंदन येत होते. सरपंच मंगेश शेलार यांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर ध्वजस्तंभ उभारून तेथे प्रथमच झेंडावंदन केले. या वेळी उपसरपंच सागर आंग्रे, ग्रामपंचायत सदस्य ग्रामविकास अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामपंचायत कार्यालयासमोर झेंडावंदन सुरू केल्याबद्दल सर्व नागरिकांनी व सदस्यांनी समाधान व्यक्त केले.

## रामशेठ ठाकूर विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात ७८वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा केला गेला.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत हे होते. त्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांनी आपली प्रगती केली पाहिजे. शिक्षण क्षेत्रात घडत गेलेली क्रांती याबद्दल माहिती दिली, तसेच स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी, जयदास तेलवणे, सचिन वास्कर, इरशाद शेख, आरटीसीसीएसचे प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड, प्राचार्या निशा नायर आदी उपस्थित होते.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी शुभेच्छा दिल्या.



**पनवेल : चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयातील पूर्व प्राथमिक विभाग इंग्रजी माध्यमात मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षिका वैशाली पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली संकुलात रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मुलींनी वेगवेगळ्या प्रकारच्या रंगीबेरंगी राख्या मुलांच्या हातावर बांधल्या आणि मुलांनी मुलींसाठी चॉकलेट्स, मिठाई तसेच विविध भेटवस्तू दिल्या.**

## सीकेटी विद्यालयात अग्निशमन दलाचे प्रात्यक्षिक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येथील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या इंग्लिश मिडियम प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी (दि.१६) अग्निशमन दलाच्या प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले.

अनेकदा आपण इमारतीला, कारखान्याला, गोडाऊनला लागलेली भीषण आग तसेच घरामध्ये गॅस गळती झाल्यानंतर लागणाऱ्या आगीविषयी ऐकतो. अशा वेळी न घाबरता, कार्यतत्परता दाखवून अग्निशमन दलाला कसे पाचारण करावे व आगीवर कसे नियंत्रण मिळवावे या सर्व प्रात्यक्षिकांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करण्यात आले.



या वेळी सिडको अग्निशमन केंद्र नवीन पनवेल अग्निशमन प्रणेता के. ए. राठोड, प्रणेता पि. के. दरेकर, यंत्र संचालक आर.एल.फरांदे, फायरमन एस. डी. तांडेल व जे. टी. मोर्बेकर यांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके दाखवून विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण केली.

## दुचाकीच्या धडकेत तरुण जखमी

**पनवेल** : दुचाकीने धडक दिल्याने झालेल्या अपघातात २१ वर्षीय निखिल मौर्य हा जखमी झाला. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात दुचाकी (एमएच ४६ सीएन ९७३७)वरील चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

निखिल मौर्य हा करंजाडे आर ५ येथे राहतो. स्प्लेंडर (एमएच ४६ सीएफ २०८५) याने तो नवीन पनवेल ते करंजाडे येथे जात होता. आर ४ करंजाडे येथील नदीच्या ब्रिजच्या अगोदर भावाचा फोन आल्याने त्यांनी गाडी बाजूला लावली व फोनवर बोलत होता. तो पुन्हा गाडीवर बसून गाडी चालू केली असता विरूद्ध दिशेने येणाऱ्या दुचाकीवरील चालकाने त्याला ठोकर दिली यात तो खाली पडला व जखमी झाला.

## रक्षाबंधनासाठी उरणची बाजारपेठ सजली

### चांदीच्या राख्यांना बहिणींची अधिक पसंती



**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

रक्षाबंधन सण काही दिवसांवर येऊन ठेपल्याने उरण शहरासह परिसरातील बाजारपेठा राख्यांनी सजल्या आहेत. आपल्या पसंतीस उतरेल, अशी राखी घेण्यासाठी महिलांनी उरणच्या बाजारात एकच गर्दी करीत आहेत. आपल्या बहिणीसाठी भेटवस्तू खरेदी करण्यासाठी आर्चिस व इतर भेटवस्तूची दुकाने फुलून निघाली आहेत. राख्यांच्या किंमतीत गेल्या वर्षीच्या तुलनेत थोडीफार वाढ झाली आहे, मात्र त्याचा ग्राहकांवर विशेष परिणाम होत नसल्याने दिसून आले.

> **हल्ली छोट्या राख्यांना ग्राहकांची पसंती मिळत आहे. किमतीतही गेल्या राखीसाठी लागणारे रेशीम कुंदन व मजुरी वाढल्याने गेल्या वर्षीच्या तुलनेत १० ते १५ रुपयांची राखीत वाढ झाली आहे, मात्र ग्राहकांचीही त्याबद्दल तक्रार नाही.**
>
> **-संजय चौधरी, राखी विक्रेते, उरण**

चांदीच्या राख्यांना बहिणींची विशेष पसंती मिळत असल्याचे चित्र आहे.

विविध प्रकारच्या, रंगीबेरंगी आणि आकर्षक राख्या बाजारात उपलब्ध झाल्या आहेत. यात १० रुपयांपासून ते हजार रुपयांपर्यंतच्या राख्या बाजारात उपलब्ध झाल्या आहेत. फुलांच्या नक्षीवर खडे, कुंदन, विणकाम आदी सजावट करून तयार केलेली राखी ग्राहकांना आकर्षित करीत आहेत. बाजारात या जुन्या पद्धतीच्या गोंड्याच्या राख्या नव्या रूपात पहायला मिळत आहेत. जरीची राखी मोत्याची राखी, नाण्याची राखी या नवीन राख्या यंदा उपलब्ध असून त्यांची किंमत ८० ते १०० रुपयांपर्यंत आहे.

प्रत्यक्ष भावाचे नाव लिहून आणि धाग्यात गुंफलेल्या राखीला विशेष मागणीही आहे. अ‍ॅक्रेलिक आणि लाकूड या दोन प्रकारांत या राख्या उपलब्ध आहेत. त्यांची किंमत साधारण २५० ते ३५० रु. इतकी आहे. सोन्या, चांदीच्या राख्यांनाही मागणी असून या राख्या आगाऊ ऑर्डर देऊन बनविण्यासाठी दिल्या असल्याची माहिती दुकानदारांनी दिली. आकर्षक, स्वस्त व मस्त तसेच टिकाऊ असणाऱ्या चांदीच्या राख्या अवघ्या १५० रुपयांपासून मिळत असल्याने चांदीच्या राख्या घेण्याकडे महिला वर्गाचा कल वाढला आहे.

## खारघरमधील ज्वेलर्सला लुटून पळालेले दरोडेखोर ताब्यात; हत्यार, दुचाकीसह मुद्देमाल हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

खारघर पोलीस ठाणे हद्दीत सेक्टर ३५ येथे असलेल्या बी.एम. ज्वेलर्समध्ये तीन हेल्मेट परिधान केलेल्या अज्ञातांनी ११ लाख ८० हजार रुपयांचा दरोडा टाकला होता. भरगर्दीच्या वेळी दुचाकीवरून आलेल्या या लुटारूंनी ज्वेलर्स तर लुटलेच, मात्र पळून जाताना आपल्याकडे असलेल्या बंदुकीने हवेत गोळीबारदेखील केला. यामुळे खळबळ माजली होती. याबाबत खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती.

घटनेचे गांभीर्य ओळखून नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, पोलीस सहआयुक्त संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त दीपक साकोरे, पोलीस उपायुक्त अमित काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने तपास सुरू केला. पोलीस पथकाने प्रथमतः



घटनास्थळास तत्काळ भेट दिली. आरोपी येण्याच्या व जाण्याच्या मार्गावरील सीसीटीव्ही फुटेज मिळवले.

यानंतर तांत्रिक तपासाव्दारे या गुन्ह्यात चार आरोपींचा समावेश असल्याचे निष्पन्न झाले. लागलीच पोलिसांची विविध पथके सुरत, गुजरात उदयपूर, राजस्थान व रायगड जिल्ह्यातील नेरळ, माथेरान या ठिकाणी आरोपींच्या मागावर रवाना झाली. अखेर पोलीस पथकाने रिझवान अलीशेख (वय २७, रा. सुरत), अझरुद्दीन हुसनोदीन शेख (वय २८, रा. सुरत), ताहा तनवीर परवेझ सिंधी (वय २१, रा. उदयपूर, राजस्थान) आणि राजविर रामेश्वर कुमावत (वय २०, रा. उदयपूर, राजस्थान) या आरोपींना ताब्यात घेतले.

या वेळी आरोपींची कसून चौकशी केल्यानंतर गुन्ह्यात वापरण्यात आलेली दोन अग्निशस्त्रे, तीन जिवंत काडतुसे, गुन्हा करताना वापरलेली दुचाकी आणि चोरीस गेलेली मालमत्तादेखील नागपाडा, मुंबई येथून हस्तगत करण्यात आली आहे.

दरम्यान, या आरोपींना १६ ऑगस्ट रोजी न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना २२ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## संपादकीय

# स्त्रीअत्याचारविरोधी आंदोलन

कोलकाता येथील आरजी कर मेडिकल कॉलेजमधील ज्युनियर डॉक्टरच्या बलात्कार व हत्या प्रकरणामुळे देशभरातील डॉक्टरांमध्ये निर्माण झालेले संतापाचे वातावरण शमलेले नाही. ८-९ ऑगस्टच्या मध्यरात्री संबंधित निवासी डॉक्टरची हॉस्पिटलमधील सेमिनार हॉलमध्ये बलात्कारानंतर हत्या झाल्याचे आढळले होते. या घटनेचे पडसाद देशभरात उमटण्यास सुरुवात झाली असून डॉक्टरांच्या निरनिराळ्या संघटनांनी शनिवारी कामबंद आंदोलनाची हाक दिली आहे. या निदर्शनांना अधिक व्यापक स्वरूप प्राप्त होण्याचीही चिन्हे आहेत.

**बलात्कार व हत्येच्या या गुन्ह्याच्या प्राथमिक नोंदणीत संबंधित मेडिकल कॉलेजकडून झालेली अक्षम्य हेळसांड, कोलकाता पोलिसांची तपासातील ढिलाई या पार्श्वभूमीवर कोलकाता उच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल झाल्या. यात संबंधित डॉक्टर मुलीच्या पालकांचीही याचिका होती. या प्रकरणातील संशयित आरोपीला पोलिसांनी अटक केली, पण या घटनेभोवतीच्या एकंदर संशयास्पद परिस्थितीमुळे कोलकाता उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर हे प्रकरण पोलिसांनी सीबीआयकडे सोपवले. संबंधित ज्युनियर डॉक्टरवर सामूहिक बलात्कार झाल्याचाही आरोप करण्यात आला आहे. शवविच्छेदन अहवालातून हाती आलेल्या तपशीलांतून डॉक्टरांच्या संघटनांनी हा आरोप केला आहे. तिच्या अंगावरील जखमांमुळेही हे कुणा एकट्याचे काम नव्हते असे दिसत असल्याचे या डॉक्टरांचे म्हणणे आहे. कोलकाता पोलिसांनी संबंधित सेमिनार हॉल सील न केल्याबद्दलही आंदोलनकर्ते डॉक्टर प्रश्न उपस्थित करत असून एकंदरच या प्रकरणी झालेली हेळसांड पाहता पश्चिम बंगालमधील कायदा व सुव्यवस्था स्थितीबद्दल अनेकांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. कोलकाता येथील एका समाजशास्त्रविषयक संशोधिकेच्या 'रिक्लेम द नाइट' या आवाहनावरून बुधवारी मध्यरात्री महिलांचा प्रचंड मोठा जमाव निदर्शनांसाठी रस्त्यावर उतरला. हे आंदोलन कोलकात्यापुरते सीमित राहिले नाही, तर पश्चिम बंगालमधील अन्य शहरांमध्येही ते पसरले. महिला निदर्शकांना निदर्शने करण्यापासून रोखू नये असे आदेश अखेर तेथील तृणमूल काँग्रेस सरकारला द्यावे लागले. २०१२ सालच्या राजधानी नवी दिल्लीतील निर्भया बलात्कार प्रकरणानंतर प्रथमच बलात्काराच्या एखाद्या प्रकरणाविरोधात इतक्या मोठ्या प्रमाणात नागरिकांमध्ये चीड दिसून येते आहे. कोलकात्यातून सुरू झालेली 'रिक्लेम द नाइट' ही चळवळ देशातील अन्य शहरांमध्येही गुरुवारी सकाळपर्यंत पसरलेली दिसली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात देशातील स्त्रियांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांचा उल्लेख केला. देशातील जनतेमध्ये या अत्याचारांच्या विरोधात प्रचंड चीड असून देशाने, समाजाने आणि राज्य सरकारांनी हा असंतोष गांभीर्याने घेण्याची गरज आहे, असे प्रतिपादन मोदींनी या वेळी केले. स्त्रियांशी संबंधित गुन्ह्यांच्या प्रकरणांत वेगाने तपास करून क्रूरकर्म्यांना तातडीने कठोर शिक्षा करण्याची गरज आहे, तरच समाजात विश्वासाचे वातावरण निर्माण होईल असेही ते म्हणाले. पंतप्रधानांनी दखल घेतल्यामुळे शुक्रवारी दिवसभर देशातील समाजमाध्यमांवर स्त्रियांवरील अत्याचाराच्या चर्चेचे असंख्य संदेश व्हायरल झालेले दिसले. महिलांवरील अत्याचारांकडे अधिक गांभीर्याने व व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे व गुन्हेगारांना तातडीने कठोर शिक्षा ठोठावली गेली पाहिजे अशा मागण्या या संदेशांमध्ये दिसत आहेत. पुरुषांच्या स्त्रियांविषयीच्या दृष्टिकोनात मूलभूत बदल घडवून आणण्यासाठी या समस्येविषयीच्या चर्चेत पुरुषांना सहभागी करून घेण्यावरही भर दिला जातो आहे. नेहमी आक्रमक पवित्रा घेणाऱ्या पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनाही जनतेच्या रोषाचे व्यापक स्वरूप पाहता या प्रकरणी संयम बाळगावा लागला असून शनिवारी देशभरातील डॉक्टर न्यायाची मागणी करीत चोवीस तासांचा संप पुकारणार आहेत.**

# तीर्थदर्शन योजनेतून धार्मिक स्थळे पाहूया!



विविधतेने नटलेला असा आपला भारत देश आहे. भारतात तसेच महाराष्ट्रासह इतर राज्यांमध्ये भाविकांनी गजबजलेली प्रसिद्ध तीर्थक्षेत्रे पाहायला मिळतात. राज्यासह देशात असे असंख्य ज्येष्ठ नागरिक आहेत. ज्यांचे या तीर्थक्षेत्रांना आयुष्यात एकदा तरी भेट देता यावी असे स्वप्न असते, पण अनेकदा गोरगरीब सर्वसामान्य कुटुंबातील नागरिकांना त्यांच्या आर्थिक अडचणींमुळे तसेच कुणी सोबत नसल्यामुळे आणि पुरेशा माहितीच्या अभावाने तिथे जाता येत नाही, परंतु आता अशा ज्येष्ठ नागरिकांना काळजी करण्याचे कोणतेही कारण नाही. काही ज्येष्ठ नागरिक आर्थिक, शारीरिक परिस्थितीमुळे त्यांची तीर्थक्षेत्रांना जाण्याची इच्छा पूर्ण करू शकत नाहीत. हीच बाब लक्षात घेऊन राज्य शासनाने महाराष्ट्रातील सर्व धर्मियांमधील ज्येष्ठ नागरिकांसाठी म्हणजेच ६० वर्ष व त्यावरील नागरिकांसाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरू केली आहे.

हिंदू धर्मात चारधाम यात्रा, माता वैष्णोदेवी यात्रा, अमरनाथ यात्रा तसेच इतर धर्मियांची मोठी तीर्थक्षेत्रे आहेत. देशातील महत्त्वाच्या तीर्थक्षेत्राची मोफत यात्रा करण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना या योजनेमध्ये भारतातील एकूण ७३ व महाराष्ट्र राज्यातील ६६ तीर्थक्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे. जवळपास देशातील व राज्यातील सर्व महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे.

**योजना सुरू करण्यामागचा मानस**

राज्यातील सर्व धर्मातील सर्वसामान्य कुटुंबातील ज्येष्ठ नागरिक त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे वा कोणी सोबत नसल्याने आणि पुरेशी माहिती नसल्यामुळे तीर्थयात्रा करण्याचे स्वप्न पूर्ण होत नाही. ही बाब विचारात घेऊन ज्येष्ठ नागरिकांना देशातील मोठ्या तीर्थ स्थळांना जाण्याची इच्छा पूर्ण व्हावी. यासाठी त्यांना राज्यातील आणि भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत भेटीची-दर्शनाची संधी देण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरू करण्यात आली आहे.

**योजनेत कोणत्या स्थळांचा समावेश**

या योजनेमध्ये भारतातील एकूण ७३ व महाराष्ट्र राज्यातील ६६ तीर्थक्षेत्रांचा योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. यामध्ये मुंबईतील सिद्धीविनायक, चैत्यभूमी, माउंट मेरी चर्च आणि इतर महत्त्वाच्या ठिकाणांचाही समावेश आहे. तीर्थक्षेत्रांमध्ये वैष्णोदेवी मंदिर, अमरनाथ गुहा, अमृतसरमधील सुवर्ण मंदिर, अयोध्येतील श्रीराम मंदिर, वेरावळमधील सोमनाथ मंदिर आणि ओडिशातील जगन्नाथ पुरी या प्रमुख धार्मिक स्थळांचा समावेश होतो. याशिवाय तामिळनाडू, केरळ, मध्य प्रदेश, राजस्थान, बिहार, उत्तर प्रदेश, गुजरात, झारखंड, आंध्र प्रदेश, आसाम, ओडिशा, झारखंड, उत्तराखंड, दिल्ली, पंजाब, जम्मू आणि काश्मिर आणि कर्नाटक या धार्मिक स्थळांचा समावेश आहे. त्याचबरोबर मुंबईतील १५ धार्मिक स्थळंही या यादीत आहेत. या योजनेंतर्गत निर्धारित तीर्थस्थळांपैकी एका स्थळाच्या यात्रेकरिता पात्र व्यक्तीला या योजनेचा केवळ एक वेळच लाभ घेता येईल.

या योजनेंतर्गत लाभार्थी व्यक्तीला प्रवास खर्चाची कमाल मर्यादा प्रती व्यक्ती ३० हजार रुपये इतकी असेल. यामध्ये प्रत्यक्ष प्रवास, भोजन, निवासाची सोय इत्यादी सर्व बाबींचा समावेश असेल.

**योजनेसाठी आवश्यक पात्रता**

लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे. वय वर्ष ६० आणि त्यावरील ज्येष्ठ नागरिक तसेच लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम अडीच लाखांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

**योजनेसाठी अपात्र कोण ठरणार?**

कुटुंबातील सदस्य आयकरदाता नसावा. कुटुंबातील सदस्य नियमित, कायम कर्मचारी म्हणून सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ, भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत आहेत किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहेत, असे सदस्य या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र ठरणार नाहीत. दरम्यान, अडीच लाखांपर्यंत उत्पन्न असलेले बाह्य यंत्रणाद्वारे कार्यरत असलेले कर्मचारी, स्वयंसेवी कामगार आणि कंत्राटी कर्मचारी मात्र या योजनेसाठी पात्र ठरतील. कुटुंबातील सदस्य विद्यमान किंवा माजी खासदार, आमदार नसावेत. कुटुंबातील सदस्य भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या बोर्ड, कॉर्पोरेशन, उपक्रमाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, सदस्य नसावेत. चारचाकी वाहनं (ट्रॅक्टर वगळून) त्याच्या कुटुंबातील सदस्यांच्या नावावर नोंदणीकृत नसावे. प्रवासासाठी शारिरीक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे आणि कोणत्याही संसर्गजन्य रोगानं ग्रस्त नसावे, जसे की टीबी, हृदयाशी संबंधित श्वसन रोग, कोरोना, थ्रोम्बोसिस, मानसिक आजार, संसर्गजन्य कुष्ठरोग इत्यादी. अर्जासोबत, ज्येष्ठ नागरिकाला सरकारी वैद्यकीय अधिकाऱ्याने पूर्ण आरोग्य तपासणी केल्यानंतर ती व्यक्ती शारीरिकदृष्ट्या निरोगी आणि प्रस्तावित प्रवासासाठी सक्षम असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. (हे प्रमाणपत्र प्रवासाच्या तारखेपासून १५ दिवसांपेक्षा जास्त जुने नसावे) जे अर्जदार मागील वर्षांमध्ये लॉटरीत निवडले गेले होते, परंतु प्रवासासाठी आमंत्रित करूनही त्यांनी प्रवास पूर्ण केला नाही.

(साभार : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)

# 'ज्ञानप्रबोधिनी'चे संस्थापक डॉ. विनायक पेंडसे



डॉ. विनायक विश्वनाथ ऊर्फ अप्पा पेंडसे (जन्म : १७ ऑगस्ट १९१६; मृत्यू १९ ऑगस्ट १९८३) हे एक दूरदृष्टी असलेले देशप्रेमी शिक्षणतज्ज्ञ होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सदस्य असलेले अप्पा पेंडसे हे पीएचडी पदवी धारण करणारे, संगीत आणि वेदान्त या दोघांतही रस असणारे तत्त्वज्ञ, लेखक, मनात क्रांतिकारी विचार बाळगणारे आदर्शवादी कार्यकर्ते होते.


स्वामी श्रद्धानंदांची एका माथेफिरू माणसाने हत्या केल्यानंतर आपण श्रद्धानंदांची जागा घ्यायची असे अप्पा पेंडसे यांनी वयाच्या १०व्या वर्षी ठरवले.

ब्रिटिशांनी भारतात पाठविलेले सर्व ब्रिटिश सभासद असलेले सायमन कमिशन जेव्हा पुण्यात आले तेव्हा त्याचे काळ्या झेंड्यांनी स्वागत करणाऱ्यांमध्ये १२ वर्षांचे अप्पा पेंडसे होते. त्यावेळी जुन्या आणि नव्या हजारो कार्यकर्त्यांनी भर उन्हात सायमन कमिशनचा धिक्कार करणारा लांबलचक मोर्चा काढला होता. भारताचे भवितव्य ठरवणाऱ्या या कमिशनमध्ये एकही भारतीय का नसावा हा त्यांचा सवाल होता. वयाच्या १४व्या वर्षी त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी आणि सुराज्यासाठी स्वतःला वाहून घेण्याची प्रतिज्ञा केली.

अप्पा पेंडसे हे लाला लजपत राय यांच्या स्काउट दलात होते; भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या मुक्तेश्वर दलात इ.स. १९३०मधे ते सामील झाले. १९३२मध्ये ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघात आले. सदूभाऊ गोखले यांनी सुरू केलेल्या राष्ट्र सेवा दलाच्या पुण्यातील पहिला सात सभासदांमधले ते एक होते. दलाच्या बँड पथकात ते बँड वाजवत. समाजगटांमध्ये व संस्थांच्या माध्यमातून काम करून भारताला स्वातंत्र्य मिळवून देणे या एकाच विचाराने ते भारले गेले होते. त्यांनी पुणे शहरात ज्ञानप्रबोधिनी नावाच्या शिक्षण संस्थेची १९६२मध्ये स्थापना केली. **(साभार : विकीपीडिया)**

## बदलते तंत्रज्ञान

# भारतात 'ॲपल'ची भरारी, ५० वर्षांचा विक्रम मोडला



ॲपल कंपनीने भारतात मोठा विक्रम केला आहे. गेल्या ५० वर्षात कोणतीही कंपनी करू न शकलेला विक्रम या कंपनीनं केला आहे. या कंपनीचा विक्रम हा उत्पादन आणि निर्यातीबाबत आहे, ज्यामुळं कंपनीची उलाढाल दोन लाख कोटी रुपयांवर पोहचली आहे.


ॲपल कंपनी जेव्हा भारतात आली, तेव्हा काही वर्षांत जगातील सर्वात मोठी कंपनी उत्पादन आणि निर्यातीच्या बाबतीत ५० वर्षांचा विक्रम मोडेल, असं कोणालाही वाटलं नाही. आता हे घडलं आहे. वित्तीय वर्ष २०२४मध्ये भारतात ॲपलच्या उत्पादन आणि निर्यातीत प्रचंड वाढ झाली आहे. सध्या कंपनीची उलाढाल दोन लाख कोटी रुपयांच्या पुढे गेली आहे. विशेष म्हणजे ॲपलच्या व्यवसायात गेल्या वर्षभरात जवळपास दुप्पट वाढ झाली आहे.

दोन वर्षांपूर्वी चीनमधील कोविड परिस्थितीमुळे पलने आपले धोरण बदलले आणि भारतात प्रवेश केला. त्यानंतर कंपनीने येथे उत्पादन वाढवले. आता भारत ही केवळ पलसाठी मोठी बाजारपेठ बनलेली नाही, तर पुरवठा करणारं एक आघाडीचं केंद्र बनलं आहे. आयफोन आणि ॲपलची इतर उत्पादने भारतातून जगातील अनेक देशांमध्ये निर्यात केली जात आहेत. मागील काही वर्षापासून आयफोनच्या निर्यातीत मोठी वाढ झाल्याचं चित्र पहायला मिळत आहे.

ॲपल आणि फॉक्सकॉन भारतात सतत त्यांच्या उत्पादन युनिट्सचा विस्तार करत आहेत. मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहेत. भारत सरकारची पीएलआय योजनाही यामध्ये खूप उपयुक्त ठरली आहे. ॲपलच्या भारतातील कामकाजात आर्थिक वर्ष २४मध्ये दोन लाख कोटी रुपयांची वाढ झाली आहे. ज्याची किंमत २०२३च्या आर्थिक वर्षात १.१५ लाख कोटी रुपये होती. आयफोन उत्पादन आणि मॅकबुक, आयमॅक, आयपॅड, वॉच आणि एअरपॉड्सच्या देशांतर्गत विक्रीत वाढ झाल्यामुळे ही वाढ दिसून आली आहे. विशेष बाब म्हणजे गेल्या ५० वर्षात भारतातील सर्व कंपन्यांमध्ये उत्पादन आणि निर्यातीत सर्वाधिक वेगाने वाढ झाली आहे.

ॲपलच्या एकूण उत्पादनात भारताचा वाटा सुमारे १४ टक्के आहे, ज्याने कंपनीच्या जागतिक निर्यातीसाठी एक महत्त्वाचे केंद्र म्हणून स्वतःची स्थापना केली आहे.

# मराठी इतिहासकार निनाद बेडेकर



## निमित्त

निनाद बेडेकर हे एक मराठी इतिहासकार होते. छत्रपती शिवाजी महाराज तसेच मराठेशाहीच्या इतिहासावर त्यांचा विशेष अभ्यास होता. जगभरात फिरून पुरातन कागदपत्रांचा सखोल अभ्यास करून गडकिल्ले धुंडाळून ते शिवकालीन इतिहासात रममाण झाले होते.

निनाद बेडेकर यांचा जन्म १७ ऑगस्ट १९४९ रोजी पुण्यामध्ये झाला. मॉडर्न शाळेतील शिक्षणानंतर त्यांनी शासकीय तंत्रनिकेतन येथून अभियांत्रिकी अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यांच्या मातोश्री या सरदार रास्ते घराण्यातील होत्या. स्वातंत्र्य चळवळीमध्ये त्यांनी महिलांचे संघटन केले होते. हाच वारसा निनाद बेडेकर यांच्याकडे आला. शिवचरित्राची गोडी लागल्याने बेडेकर इतिहास संशोधनाकडे वळाले. इतिहासाच्या अभ्यासासाठी त्यांनी मोडी, फार्सी, उर्दू या लिपींवर प्रभुत्व मिळविले. या लिपीमध्ये असलेल्या हस्तलिखिते आणि कागदपत्रांचे वाचन करून त्यांनी साहित्यनिर्मिती केली. त्याचबरोबरीने बेडेकर यांनी पर्शियन, पोर्तुगीज, फ्रेंच आणि इंग्रजी या परकीय भाषा आत्मसात केल्या. शिवचरित्र आणि १८व्या शतकात देशभर विस्तारलेले मराठी साम्राज्य या विषयांचा त्यांचा गाढा अभ्यास होता. राज्यातील आणि देशातील किल्ल्यांवर भ्रमंती करून शिवकालीन इतिहासामध्ये ते रममाण झाले होते. शिवरायांचा राज्यकारभार आणि मराठेशाही संदर्भात त्यांनी वेगळ्या दृष्टिकोनातून लेखन केले. शिवाजी महाराजांचे युद्धकौशल्य, नेतृत्वगुण, दुर्गबांधणी, आरमार उभारणी या पैलूंचा स्वतंत्रपणे अभ्यास करून त्यांनी लेखन केले होते. शिवरायांची व्यवस्थापकीय कौशल्ये हा विषय ते एमबीएच्या विद्यार्थ्यांना इंग्रजीमध्ये समजावून सांगत असत.

लालित्यपूर्ण शैलीमध्ये ऐतिहासिक लेखन करणाऱ्या बेडेकर यांची 'शिवभूषण', 'थोरलं राजं सांगून गेलं', 'गजकथा', 'हसरा इतिहास', 'दुर्गकथा', 'विजयदुर्गाचे रहस्य', 'समरांगण' आणि 'झंझावात' ही निनाद बेडेकर यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांनी ३५ पुस्तकांसह शेकडो लेख आणि शोधनिबंध लिहिले. गेल्याच महिन्यात त्यांचे 'अजरामर उद्गार' हे अखेरचे पुस्तक प्रकाशित झाले होते. तर, वसंत व्याख्यानमालेमध्ये २८ एप्रिल रोजी 'महाराष्ट्राबाहेरचा महाराष्ट्र' या विषयावर झालेले व्याख्यान हा बेडेकर यांचा अखेरचा सार्वजनिक कार्यक्रम ठरला. भारत इतिहास संशोधक मंडळ, श्री रायगड स्मारक मंडळ, श्री राजगड स्मारक मंडळ, गोनीदा दुर्गप्रेमी मंडळ या संस्थांशी संबंधित असलेले बेडेकर हे पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धाचे आयोजन करणाऱ्या 'महाराष्ट्रीय कलोपासक' संस्थेचे अध्यक्ष होते. निनाद बेडेकर यांना शिवभूषण, दुर्ग साहित्य पुरस्कार, जिजामाता विद्वत गौरव पुरस्कार, पुराण पुरुष पुरस्कार, शिवपुण्यतिथी रायगड पुरस्कार या पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते. शनिवारवाडा येथील ध्वनिप्रकाश योजनेमध्ये दाखविल्या जाणाऱ्या ऐतिहासिक कार्यक्रमासाठी बेडेकर यांनी संहितालेखन केले होते. १० मे २०१५ रोजी पुण्यात त्यांचे निधन झाले. बेडेकर यांना किडनीविकार जडला होता. ६५व्या वर्षी त्यांनी खासगी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला.

## क्लिक...क्लिक...!



**पनवेल : श्रावण महिन्यापासून मराठी सण-उत्सवांना सुरुवात होते. सणावारामध्ये गोडधोड बनवून नाचून, गाऊन आनंद लुटला जातो. सर्वांचा आवडता गणेशोत्सवही जवळ येत आहे. या पार्श्वभूमीवर राजस्थानहून ढोलकी विक्रेते कुटुंबासह येथे आले आहेत.**

## आरोग्य प्रहर

# रेड पेअर फळ खाण्याचे अनेक फायदे

फळांनी आपल्या शरीराला पोषक तत्व मिळत असतात. त्यामुळे डॉक्टरांपासून ते घरातील वयस्कर मंडळी मुलांना फळे खाण्याचा सल्ला देत असतात. प्रत्येक मोसमातील फळांचा आस्वाद घ्यायलाच हवा. रेड पेअर हे फळ ज्याला हिंदीत लाल नाशपाती असे नाव आहे. हे फळ पावसाळ्यात मिळते हे फळ आरोग्यासाठी महत्वाचे आहे. रेड पेअर या फळाला गरीबांचे सफरचंद म्हणतात.



हे फळ खूपच आरोग्यदायी फळ आहे. या फळाचा आहारात समावेश केल्याने खूपत फायदे मिळतात. त्यामुळे आपले आरोग्य सुधारते. अनेक लोकांना या फळाबाबत फारसी माहिती नाही. चला तर पाहूयात रेड पेअरच्या खाण्याने आरोग्याला काय फायदा होतो.

**रोग प्रतिकारकशक्ती वाढते**

रेड पेअरमध्ये सी विटामिन्स भरपूर प्रमाणात असते. त्यामुळे लाल पेअर फळ आपली इम्युनिटी वाढण्यासाठी उपयोगी पडते. या फळात कॉपरची तत्वेदेखील खूप असतात. ज्यामुळे इन्फेक्शनपासून लढण्याची ताकद मिळत असते.

**गर्भवती महिलांसाठी उपयोगी**

जर गर्भवती महिलांनी रेड पेअरचा वापर आहारात केला तर खूपच आरोग्याला फायदा मिळतो. यात फोलिक एसिड असल्याने कोणत्याही अनुवंशिक विकलांगतेला हे फळ रोखते. आणि आई आणि बाळाच्या आरोग्याचे रक्षण करते.

**पचनव्यवस्था सुधारते**

पचन व्यवस्था सुधारण्यासाठीदेखील हे रेड पेअर फायदेशीर ठरते. रेड पेअरमध्ये फायबर आणि पोटॅशियम भूरपूर प्रमाणात असते. त्यामुळे ब्लड प्रेशरदेखील सामान्य राहण्यासाठी मदत होते तसेच हृदयरोगातदेखील हे फळ सेवन करणे फायदेशीर सिद्ध होते.

**ब्लड शुगर कंट्रोल करते**

रेड पेअरमध्ये एंथोसायनिन भरपूर असते. त्यामुळे ब्लड प्रेशर सामान्य राहाण्यास मदत मिळते. त्यामुळे रेड पेअर याला आहारात सामील केल्यास टाईप - २ डायबिटीजची धोका करण्यास मदत मिळते.

**फ्री रेडिकिल्सपासून बचाव**

रेड पेअरमध्ये विटामिन्स ए,सी आणि के भरपूर असते. त्यामुळे फ्रि रेडिकिल्सपासून वाचता येते. या फळात एंटिऑक्सीडेंट तत्व खूप आढल्याने त्यामुळे पेशी डॅमेज होण्यापासून वाचतात.

# पेण शहरातील मूलभूत सुविधांसाठी कटिबद्ध

## आमदार रविशेठ पाटील यांचे प्रतिपादन




**पेण : प्रतिनिधी**

पेण शहराला सर्व मूलभूत सुविधा मिळाव्यात यासाठी मी सदैव कटिबद्ध राहीन, असे आश्वासन आमदार रविशेठ पाटील यांनी केले. पेण नगर परिषद कार्यक्षेत्रातील मुख्य ११ रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण आणि मेन ड्रेनेज लाईनच्या बांधकामाचे भूमिपूजन आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, पेण शहराच्या गल्लीबोळातले रस्ते, अंतर्गत रस्ते, रहदारीच्या मुख्य रस्त्यावर सिमेंट क्रॉक्रीटचे टीकाऊ न फुटतुट होणारे रस्त्याचे बांधकाम करणे मुख्य गटारे अंतर्गत गटारे, कुंभार तलाव, कवंडाल तलाव, मोतीराम तलाव, कासार तलावाचे सुशोभीकरण, नाट्यगृह नूतनीकरण, रिंग रोड कॉंक्रिटीकरण, भोगवती नदी गणपती विसर्जन घाट बांधकाम व सुशोभीकरण घाट, विश्वेश्वर स्मशानभूमी आधुनिकीकरण, छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज मंदिर या विकासकामांबरोबर शहरातील नागरिकांना तब्बल १६५ कोटी रुपयांची हेटवणे व आंबेघर धरणातून थेट पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यासाठी सतत पाठपुरावा करण्यात येत आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी तब्बल ३५० ते ४०० कोटींचा विकासनिधी केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून आपण आणण्यासाठी प्रयत्न केले. भाजपचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर सर्व नेत्यांनी यासाठी सहकार्य केल्याने ही सर्व कामे करणे शक्य झाले, असेही त्यांनी नमूद केले.

माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील यांनी, गेल्या १० वर्षांत आमदार रविशेठ पाटील यांच्या नेतृत्वाखाली पेण नगरपालिकेवर सत्ता असून एका ध्येयाने व उद्दिष्टाने शहराच्या विकासासाठी भरघोस निधी आणण्यासाठी आमदार रविशेठ पाटील यांनी सतत पाठपुरावा केला. एमएमआरडीएच्या माध्यमातून ५४ कोटींचा निधी रस्ते विकासासाठी आणण्याचे काम केले आहे, असे प्रतिपादन केले.

या भूमिपूजन समारंभास भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष माजी आमदार धैर्यशील पाटील, मुख्याधिकारी जीवन पाटील, बांधकाम अभियंता सुहास कांबळे, सहाय्यक अभियंता विनायक बनसोडे, माजी उपनगराध्यक्ष वैशाली कडू, राजेश मापारा, माजी नगरसेविका शहनाज मुजावर, ज्योती म्हात्रे, नीलिमा पवार, अजय क्षिरसागर, माजी जि.प.सदस्य डी. बी. पाटील, महिलाध्यक्ष निशिगंधा गुंड, सुप्रिया चव्हाण, नगर पालिका प्रशासनाचे अधिकारी किरण शहा, शिवाजी चव्हाण, रमेश देशमुख, उमंग कदम, सहाय्यक अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते खोपोलीत सिनेमा हॉलचे उद्घाटन

**खोपोली : प्रतिनिधी**

शहरातील मध्यवर्ती असणाऱ्या मुंबई-पुणे महामार्गावरील सॅम्युअल सिनेमा हॉलचे उद्घाटन स्वातंत्र्य दिनी आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते झाले.

खोपोलीसारख्या छोट्या शहरात मनोरंजनासाठी साधने उपलब्ध नसताना, बेबी सॅम्युअल यांनी अद्यावत दोन सिनेमा हॉलची निर्मिती करून येथील जनतेला मनोरंजनाची साधने उपलब्ध केल्याबद्दल थोरवे यांनी कौतुक केले. या समारंभाला माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसूरकर, डॉ. सुनील पाटील, माजी नगरसेवक मोहन औसरमल, किशोर पानसरे, महादू जाधव, राजू गायकवाड, राजू धुमणे, शिवसेना संपर्कप्रमुख पंकज पाटील, शहर प्रमुख संदीप पाटील, महिला आघाडीच्या प्रिया जाधव, माधवी रिठे, मेघा वाडकर, व्हीडीएम स्कूलचे चेअरमन उल्हासराव देशमुख, रिपाई नेते हिरामण निळे, ज्येष्ठ उद्योजक यशवंत साबळे, विक्रम साबळे, लक्ष्मण रिठे, प्रसाद वाडकर, अनिल मिंडे, संतोष खुरपडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे स्वागत रॉबिन सॅम्युअल, ईबिन सॅम्युअल व माजी नगरसेविका जिनी सॅम्युअल यांनी केले. या वेळी आमदार थोरवे यांच्यासह मान्यवरांनी चित्रपटाचा आस्वाद घेतला.



## शुध्दीपत्रक

शुध्दीपत्रक देण्यात येते कि, दि २८ मे २०२४ रोजी ''दैनिक रामप्रहर'' ह्या वृत्तपत्रामध्ये पान क्र. ७ वर माझ्या कडून जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर जाहीर नोटीस मध्ये नमूद केलेले मिळकतीचे वर्णन मध्ये मौजे नितळस ता. पनवेल जि. रायगड येथील गट नं. ३२ हि.नं. ६ क्षेत्र ०-४७-३० पो.ख.०-००-८० एकूण ०-४८-१० पैकी ०-२५-०० आकार ७.९४ असे नजरचुकीने छापण्यात आले होते. तरी ह्यापुढे सदर जाहीर नोटीस मध्ये नमूद मिळकतीचे एकूण क्षेत्र ०-४८- १० पैकी ०-२१-०० असे वाचण्यात यावे.

**दिनांक : १५.०८.२०२४**
**ठिकाण : मु. पनवेल जि. रायगड**

**सही /-**
**ॲड. मनीष आर बोहरा**

पत्ता-१०४,१४२अ, धनश्री बिल्डिंग, एम.सी.सी.एच. सोसायटी, मु. पनवेल जि. रायगड ४१० २०६
मोबाईल नं. ९७०२३५१११/७०२१७७९६७९

## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग :** बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्या वाढली आहे. गुरुवारी (दि.१५) वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३०२ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून दोन लाख ७१ हजार २०० रुपये इतका दंड आकारला आहे.

## नाव / पत्त्यात बदल

I **Vijaykumar Annappa Mali** Now I will be known as Vijaykumar Annasaheb Mali, Gazate No-M- 1517682/ July 2015. My Father Full Name is Annasaheb Dadu Mali Affidavit No-1660/2024.
Date-30, July 2024

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे-चिखले, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं. /हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ८५/२/ ब | एकूण क्षेत्र ०-२४-००<br>पैकी ०-२२-०० | ४.०२ | **भालचंद्र गणेश रोडपालकर**<br>**सचिन गणेश रोडपालकर** |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मत्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. १६/०८/२०२४**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल.
मो.क्र. : ९९३०३६९८६१

## मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई

**(महाराष्ट्र मोटर वाहन नियम, १९८९ मधील २६०(१) अन्वये नोटीस)**
**अर्ज क्रमांक : MACP १३०४/२०१८**

**सरोज संतोष पाठक** — **अर्जदार**
**विरूद्ध**
**दिनेश सखाराम परब** — **विरूद्ध पक्षकार**
**आणि**
**रिलायन्स जनरल इं. कंपनी लि.** — **विमाकार**

**प्रति,**
**दिनेश सखाराम परब**
**पत्ता-** मुक्काम पोस्ट- पडघे कोलवाडी,
ता. पनवेल, जि. रायगड ४०० ०९२
यांस,

ज्याअर्थी सोबत जोडलेल्या अर्जानुसार आपणाविरूद्ध मोटर वाहन अधिनियम,१९८८ कलम १६५,पोट कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचा अपघाताबाबत मोटर वाहन अधिनियम १९८८, कलम १६६ आणि १४० अ नुसार भरपाई मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी, उक्त अर्जाची दिनांक **२६-०८-२०२४** रोजी **सकाळी ११.००** वाजता , माननीय **सदस्य श्रीमती. सृष्टी निळकंठ** यांच्या न्यायधिकरणात सुनावणी करून सदर अर्ज निकालात काढण्याचे ठरवले आहे, याची दखल घ्यावी.

या नोटीशीद्वारे आपणांस कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या दिनांकास आपण हजर रहावे व आपणांस जो कोणताही साक्षीपुरावा सादर करण्याची इच्छा असेल तो साक्षीपुरावा सादर करावा. अर्जामध्ये केलेल्या दाव्याबाबत आपण आपले लेखी निवेदन दाखल करू शकता. या नोटीशीद्वारे आपणांस असेही कळविण्यात येते की,संदर्भाधीन अर्ज निकालात काढण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकास आपण हजर राहिला नाहीत किंवा साक्षीपुरावा सादर करू शकला नाहीत, तर सदरहू अर्जाची सुनावणी व निर्णय आपल्या अनुपस्थितीत करण्यात येईल, याची दखल घ्यावी.

ही नोटीस आज दिनांक **०१-०७-२०२४** रोजी माझ्या सहीने व न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी देण्यात आली आहे.

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून
सही/-
सदस्य
मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
९, हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर,
मुंबई ४००००१

## जाहीर सूचना

याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की, खाली दिलेल्या **परिशिष्टा** मध्ये अधिक विशेषतः वर्णन केलेल्या जमिनीच्या संदर्भात आम्ही, श्रीमती चित्रा शिरिष जोशी ("**मालक**") यांच्या सदर जमिनीवरील मालकीहक्काची चौकशी करत आहोत.

सर्व किंवा कोणतीही व्यक्ती/संस्था/हिंदू अविभक्त कुटुंब/ कंपनी/ बँक/ फर्म/ असोसिएशन/कर्जदार/ अधिकारी ज्यांचा कोणताही हिस्सा, हक्क, शीर्षक, दावा, आक्षेप, लाभ, मागणी आणि/किंवा नमूद केलेल्या मालमत्तेच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात विक्री, अदलाबदली, भाडेपट्टी, सब-लीज, परवाना, तात्पुरत्या जागा वापराचा परवाना, काळजी वाहू तत्वावर, कुळ हक्क, उप-भाडेपट्टा, असाइनमेंट, रिलीझ, त्याग, गहाण, वारसा, मृत्युपत्र, उत्तराधिकार, भेट, धारणाधिकार, बोजा, देखभाल, वहिवाट, तारण, ट्रस्ट, कब्जा, ताबा, कुटुंब व्यवस्था/तडजोड, खटला, लिस-पेंडन्स किंवा इतर कोणत्याही पद्धतीद्वारे कोणताही करार, दस्तऐवज, लेख, फरोक्तखत, सामंजस्य करार, मृत्युपत्र, व्यवस्थापत्र, कुलमुखत्यारपत्र, कोणत्याही न्यायालयाचे आदेश अथवा हुकूम, करार, विकासनाचे हक्क, भागीदारी, एफएसआय वापर करार किंवा इतर कोणत्याही प्रकारचे व स्वरूपाचे भार या अन्वये कोणत्याही अथवा कसल्याही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास याद्वारे कागदोपत्री पुराव्यासह सार्वजनिक सूचना प्रसिद्ध झाल्यापासून **१४ (चौदा)** दिवसांच्या आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर खाली स्वाक्षरी करणार यांचेकडे ते लेखी कळवणे आवश्यक आहे. असा कोणताही दावा प्राप्त न झाल्यास, असा कोणताही दावा अस्तित्वात नाही किंवा तो माफ केला गेला आहे किंवा सोडला गेला आहे असे मानले जाईल.

**वर उल्लेखित परिशिष्ट**
**(जमिनीचे वर्णन)**

पुढे नमूद केलेली जमीन व तिचा संपूर्ण भाग -

१. गट/सर्वे क्रमांक ६४, हिस्सा क्रमांक १, क्षेत्र ०-५३-० हेक्टर (५३ गुंठा चे समान),
२. गट/सर्वे क्रमांक ६६, हिस्सा क्रमांक २, क्षेत्र ०-३३-९० हेक्टर (३३.९ गुंठा चे समान),

असलेली जमीन मिळकत ही मौजे नानोशी, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, येथील तसेच सह दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधिकार क्षेत्रातील तसेच पंचायत समिती पनवेल व जिल्हा परिषद रायगड यांचे क्षेत्रातील जमीन मिळकत आहे.

आज दिनांक १७ ऑगस्ट २०२४ रोजी

दीपा बिष्ट
वकील
द्वारा. तिसरा मजला, सुनामा हाऊस, १४०, ऑगस्ट क्रांती मार्ग, शालिमार हॉटेल समोर, केम्प्स कॉर्नर, मुंबई - ४०० ०२६.
ईमेल: adv.deepabisht@gmail.com

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

**वर्ष १०, अंक ४१(२)]** **बुधवार, मार्च १३, २०२४/फाल्गुन २३, शके १९४५** **[पृष्ठे ८१, किंमत : रुपये ९.००**

**असाधारण क्रमांक १४०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १३ मार्च २०२४.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र महामार्ग अधिनियम.**

क्रमांक खाक्षेस-२०२४/प्र.क्र.१२३/रस्ते-८. ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित हे महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) याच्या कलम ४ च्या परंतुकाच्या तरतुदीं अनुसार (यात यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त अधिनियम'' म्हणून करण्यात आला आहे) रेवस रेड्डी सागरी महामार्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज्य महामार्ग (विशेष) क्र.०५ यासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त महामाग'' असा करण्यात आला आहे) महामार्ग प्राधिकरण आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित महामार्ग प्राधिकरणाने उक्त महामार्गाच्या संदर्भात महामार्ग प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र शासनाला विनंती केली आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूचीत उल्लेखित जमीन (यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे) उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी आवश्यक एक सार्वजनिक प्रयोजन म्हणून उक्त अधिनियमाच्या तरतुदीं अंतर्गत उक्त महामार्ग प्राधिकरणासाठी, महाराष्ट्र शासनाकडून अधिग्रहित करण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे की. एका सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन ही उक्त महामार्गाचे किंवा त्याच्या काही भागाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यासाठी आवश्यक आहे आणि म्हणून उक्त महामार्ग प्राधिकरणासाठी, पूर्वोक्त प्रयोजनांकरिता, उक्त जमीन संपादित करणे शासनास इष्ट वाटते;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ (१९५५ चा ५५) याच्या कलम १५ च्या पोट-कलम (२) व (३) व कलम १७ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे,-

(एक) उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन करणे यांसाठी उक्त महामार्ग प्राधिकरणासाठी उक्त जमिनीचे संपादन करण्याची घोषणा करीत आहे:

(दोन) विनिर्दिष्ट करीत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ७ अंतर्गत निर्गमित केलेल्या अधिसूचनेला प्रतिसाद म्हणून ज्यांच्या हरकती व सूचना यापूर्वीच विचारात घेतल्या आहेत किंवा महामार्ग प्राधिकरणाकडून सुनावणी झाली आहे अशा व्यक्तींखेरीज उक्त जमिनीशी हितसंबंधित कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत संबंधित भूसंपादन अधिकारी तथा उप-विभागीय अधिकारी, पनवेल, जिल्हा रायगड यांच्याकडे उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यासाठीच्या प्रयोजनांसाठी उक्त जमिनीच्या वापराबाबत लेखी व त्याच्या कारणांसह आक्षेप घेऊ शकते.

***अनुसुची***

संपादित करावयाची उद्देशित असलेल्या जमिनीचे वर्णन

**तालुका : उरण** **जिल्हा : रायगड**

| अ.क्र. | गावाचे नाव | भूमापन क्रमांक/गट क्रमांक | क्षेत्र (हेक्टर आर) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | भेंडखळ | ३४०/अ | ०.००.२४ |
| २ | भेंडखळ | ३४०/ब | १.०६.३१ |
| ३ | भेंडखळ | ३४०/क | १.२४.०० |
| ४ | भेंडखळ | नाला लागु गट नं.३४० | १.९४.२७ |
| ५ | भेंडखळ | ३४० | ०.३१.७६ |
| ६ | बोकडवीरा | १९८ | २.७८.२२ |
| ७ | बोकडवीरा | १९४ | ०.२७.७३ |
| ८ | बोकडवीरा | १९६ | ०.८२.७५ |
| ९ | बोकडवीरा | नाला लागु गट नं.१९६, ३६५ | ०.११.६५ |
| १० | चाणजे | ३६५ | ०.५१.२१ |
| ११ | चाणजे | ३६६ | ०.३१.५६ |
| १२ | चाणजे | ३५० | ०.२२.७१ |
| १३ | चाणजे | ३४२ | ०.०७.९६ |
| १४ | चाणजे | ३५१ | ०.१५.३३ |
| १५ | चाणजे | ३४३ | ०.४६.१२ |
| १६ | चाणजे | ३४९ | ०.१५.७३ |
| १७ | चाणजे | ३६९ | ०.४६.८४ |
| १८ | चाणजे | ४२६ | ०.०५.०० |
| १९ | चाणजे | ३६७ | ०.०७.१३ |
| २० | चाणजे | ३३७ | ०.५३.०७ |
| २१ | चाणजे | ४२७ | ०.४८.४३ |
| २२ | चाणजे | ३४४ | ०.०५.८६ |
| २३ | चाणजे | ३३६ | ०.०२.२६ |
| २४ | चाणजे | ३३८ | ०.५१.७३ |
| २५ | चाणजे | ४२८ | ०.७०.७४ |
| २६ | चाणजे | ३०३ | ०.४९.३७ |
| २७ | चाणजे | ४३० | ०.५३.३४ |
| २८ | चाणजे | ४२९ | ०.५१.९८ |
| २९ | चाणजे | ३०४ | ०.००.०३ |
| ३० | चाणजे | ३०७ | ०.१४.६७ |
| ३१ | चाणजे | ३०६ | ०.४९.५६ |
| ३२ | चाणजे | ४०६ | ०.५१.९५ |
| ३३ | चाणजे | ३०५ | ०.५७.५६ |
| ३४ | चाणजे | ४१९ | २.७४.६८ |
| ३५ | चाणजे | ३३ | ०.०१.२७ |
| ३६ | चाणजे | ३२ | ०.४४.७२ |
| ३७ | चाणजे | ३१ | ०.२२.१२ |
| ३८ | चाणजे | १७ | ०.६७.९२ |
| ३९ | चाणजे | १८ | ०.९४.९१ |
| ४० | चाणजे | ९७ | ०.५३.८६ |
| ४१ | चाणजे | ३९२ | ०.०७.५८ |
| ४२ | चाणजे | ४१८ | १.५३.८१ |
| ४३ | चाणजे | २२/अ/१/१ | १.५४.४१ |
| ४४ | चाणजे | २७ | ०.९५.८६ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

**सही/-**
(सचिन चिवटे)
शासनाचे उप सचिव.

**दिनांक : १७/०८/२०२४**
**क्र. जिमाका/राअ/जाहि./६४/२०२४-२५**

# करिअरसाठी शाळा, महाविद्यालयांचे सहकार्य महत्त्वाचे -प्रभात कोळी



**विविध क्षेत्रांमधील अधिकारी, पदाधिकारी आणि तज्ज्ञ व्यक्तींच्या मुलाखती 'रामप्रहर'च्या संवादप्रहर सदरामध्ये दर शनिवारी प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. यामध्ये मान्यवर आपले विचार, मते आणि माहिती मांडणार असून विविध घडामोडींबद्दल भाष्य करतील. वाचकांसाठी हे सदर माहितीपूर्ण आणि उपयुक्त ठरेल, अशी आशा आहे. आजच्या मुलाखतीमध्ये आंतरराष्ट्रीय जलतरणपटू प्रभात कोळी यांच्याशी संवाद साधला आहे.**

रामप्रहर संवादप्रहर

**१. आपले बालपण कोठे गेले? आपल्या पोहण्याची सुरुवात कशी झाली?**

आम्ही मुळचे ट्रोम्बवेचे. मी कोळी कुटुंबातील असल्याने पाण्याशी व समुद्राशी आमचे एक वेगळे नाते आहे. लहानपणापासून पाण्याची ओढ होतीच. ते पाहून माझ्या आई-वडिलांनी मला पोहणे शिकवण्याचे ठरवले. मी आठ वर्षांचा असताना माझे प्रशिक्षक किशोर पाटील यांना माझ्यामध्ये स्पार्क असल्याचे लक्षात आले. त्यामुळे तो स्पर्धांमध्ये चांगले यश मिळवू शकतो असे त्यांनी माझ्या आईवडिलांना सांगितले. मग माझ्या आई-वडिलांनी यामध्ये पुढे जाण्याचा निर्णय घेतला.

**२. प्रथम पाण्यात उतरल्यावर कसे वाटले?**

ट्रॉम्बवेच्या जेटीवर पाण्यात गेल्यावर मला खूप चांगले वाटायचे, एक प्रकारची शांतता मिळायची, पण शिकण्यासाठी पहिल्यांदा उतरलो तेव्हा भीती वाटायची कारण त्या वेळी मजा म्हणून नाही तर शिकण्यासाठी असल्याने भीती वाटली. चौथ्या दिवशी मी पोहायला शिकलो. म्हणूनच माझ्या प्रशिक्षकांनी माझ्या आई-वडिलांना मला ॲडव्हान्स प्रशिक्षण देण्याचे सुचवले.

**३. तुमची सुरुवात स्विमिंग टँकमध्ये झाली. मग समुद्रात पोहण्याचे कसे ठरले?**

माझी सुरुवात स्विमिंग टँकमध्येच झाली. सुरुवातीची दोन-तीन वर्षे मी स्पर्धेत भाग घेतला. राज्य पातळीवर मी पोहचलो, पण मला समुद्राची ओढ लागली. आवड वाटू लागली. माझे आजोबा, वडील हे मासेमारी करायचे, पण असे पोहणारे कोणी नव्हते. माझ्या पूर्वजांसाठी मला समुद्रात पोहायचे होते. तशीच माझ्या आई-वडिलांची ही इच्छा होती. त्यासाठी धरमतर ते गेटवे पोहण्याचे ठरवले, पण २६/११च्या हल्ल्यामुळे आम्हाला परवानगी दिली नाही. मग दुसरीकडे जाऊन इव्हेंट करण्याचे ठरवले. पश्चिम बंगालमध्ये अहिरीटोला येथे १४ किमीची स्पर्धा होती. ती माझी पहिली ओपन वॉटर स्पर्धेची सुरुवात होती. आई-वडिलांनी मला त्या वेळी पाण्यात कसे जायचे, पोहायचे याचे मार्गदर्शन केले. त्यांच्यामुळेच आज मी इथपर्यंत पोहचलो. प्रशिक्षकांनी ओळखलेल्या माझ्यातील गुणवत्तेला आई-वडिलांनी जगवले असेच म्हणावे लागेल.

**४. स्विमिंग टँकमध्ये आणि खुल्या समुद्रात किंवा नदीत पोहणे यामध्ये काय फरक जाणवला?**

स्विमिंग टँकमध्ये पाण्याचे तापमान ठराविक असते. खुल्या समुद्रात किंवा नदीत पाणी थंड असते. पाण्यातील मासे व इतर जलचर प्राण्यांपासून धोका निर्माण होऊ शकतो. पश्चिम बंगालमध्ये पहिल्यांदा नदीत उतरलो, तेव्हा भीती वाटली पण थोड्याच वेळात नॉर्मल झालो आणि तो इव्हेंट मी पूर्ण केला. त्यामुळे आई-वडिलांना व माझ्या टीमला मी अशा प्रकारचे इव्हेंट करू शकतो, अशी खात्री पटली पटली.

**५. स्विमिंगसाठी महाविद्यालयात कशा प्रकारे संधी मिळाली?**

शालेय जीवनापासूनच मी स्विमिंग स्पर्धेत भाग घेत होतो. मला त्यामध्ये यशही मिळत होते. त्यामुळे माझी आवड मी पूर्ण करू शकलो. महाविद्यालयातही चांगला सपोर्ट मिळाला. माझ्या उपस्थितीबाबत सवलत दिली. त्यामुळे मला सराव करता आला. ती सवलत नसती मिळाली तर मी आज इथे नसतो.

**६. या स्पर्धांसाठी मोठा खर्च आहे. त्यासाठी कोणाची मदत मिळाली?**

ओपन वॉटर इव्हेंट खूप खर्चिक आहे. मी १९ आंतरराष्ट्रीय स्पर्धा केल्या आहेत. प्रत्येक इव्हेंटसाठी राहणे, खाणे आणि प्रवास यासाठी ८ ते १० लाख खर्च होतो. हा खेळा नवीन आहे. त्यामुळे स्पोन्सरशिप मिळणे अवघड आहे. माझ्या आई-वडिलांनी कर्ज काढले. आमच्या घर व इतर मालमत्ता विकल्या. मुंबईत स्विमिंग पूल द्यायला कोण तर नव्हते दुर्दैवाने आपल्याकडे मुंबईला असलेला समुद्र प्रदूषित असल्याने तेथे सराव करता येत नाही. त्यामुळे आजारी पडण्याची शक्यता असते. म्हणून नाईलाजाने स्विमिंग पूलमध्ये सराव करावा लागतो, पण समुद्रात सराव करायचा झाला तर मुंबईपासून थोडे लांब जाऊन सराव करावा लागतो.





कारण सात-आठ तास सराव करायला लागायचा. तेव्हा २०१३-१४मध्ये मला उलवे येथे रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जेवढा वेळ लागेल तेवढा वेळ वापरण्यास परवानगी दिली. त्यांनी आर्थिक मदतही केली. त्यामुळे मी चांगले इव्हेंट पूर्ण केले. शासनाकडून ही अजूनपर्यंत सपोर्ट मिळालेला नाही, पण मिळेल अशी अपेक्षा आहे.

**७. ओपन वॉटर इव्हेंटसाठी स्विमिंग टँकमध्ये सराव करून कसे साध्य करता?**

मी १९ आंतरराष्ट्रीय स्पर्धा व २० राष्ट्रीय स्पर्धा केल्या आहेत. एवढ्या स्पर्धा करणारा कोणी भारतीय नाही.

**८. लक्षात राहणारा इव्हेंट कोणता?**

युएसएला हवाईमध्ये मोनोकाय इव्हेंट ४८ किमीचा इव्हेंट आहे. ओशन सातपैकी सगळ्यात लांब अंतराचा इव्हेंट आहे. मी तो पूर्ण करणारा सगळ्यात तरुण मुलगा आहे. दिवसा तेथे भयानक वारे असल्याने रात्री सुरुवात करतात. अचानक समोरून वारा जोरात वाहायला लागला. माझ्यासाठी थंडरस्ट्रोम झाले. व्हेल माशांचे आवाज आले, पण रात्र असल्याने ते दिसले नाहीत. रात्री २ वाजता स्विमिंग सोडून देण्याची वेळ आली होती, पण त्या वेळी आठवले आई-वडिलांनी घेतलेली मेहनत. आईने सोबत केलेला सराव. त्यांनी केलेला खर्च. मग सकाळपर्यंत सुरू ठेवू नंतर तशीच परिस्थिती असली तर बाहेर निघू. सकाळी नवीन सूर्य आला आणि मला किनारा दिसू लागला. ५-१० किमीच राहिले होते. परिस्थितीही थोडी निवळली होती. १७ तासांनी मी किनारा गाठला.

**९. आईने कशा प्रकारे मदत केली?**

ओपन वॉटर इव्हेंट हा प्रकार नवीन असल्याने भारतात याचे फारसे प्रशिक्षक नाहीत. मी जेव्हा सात-आठ तास सराव करतो तेव्हा खाण्या पिण्याचे आईच बघते. माझे डाएटप्रमाणे वेळच्या वेळी खाणे दिले जाते का? मी रात्री सराव करीत असलो तरी ती तेथे असते. माझे किती राऊंड झाले, वेळ पाहत असते. वडिलही असतात पण ते नोकरी करीत असल्याने रात्री थोडा आराम करतात. या प्रकाराची माहिती वडिलांनीच गोळा केली. ओपन वॉटर स्वीम्ड हे माझ्यासाठी घरच झाले आहे. मी जमिनीवर पण राहतो आणि पाण्यात पण राहतो. पाणी मला वेगळे फील देते, आनंद देते. ते माझे ध्यान केंद्र आहे.

**१०. समुद्र, नदी आणि टँकमध्ये पोहणे वेगवेगळे आहे. त्याबद्दल आपण काय सांगाल?**

समुद्रात पोहताना इव्हेंट कोठे आहे यावर काय करायचे ते ठरते. खाऱ्या पाण्याची सवय करावी लागते. त्यासाठी समुद्रातच जावे लागेल. लाटांचा त्रास असतो. त्याचे टेक्निक शिकावे लागते. वाऱ्याची दिशा, वेग, तापमान याचा सराव करावा लागतो. तलवातील पाणी हे फ्रेश असते. गोडे पाणी असते. नदी आणि तलावाचे पाणी आपल्याला खेचते. त्यामुळे पोहणे अवघड असते. नवीन पोहणाऱ्यांना इंग्लिश खाडी पोहणे म्हणजे एक विंडो आहे. त्यामुळे त्यांना उत्साह मिळतो. पाणी थंड असते. माशांचा त्रास असतो. समोरचा किनारा दिसत असतो, पण तो २१ मैल दूर असतो. पोहताना ते कायम तेवढ्याच अंतरावर दिसते हे फ्रस्ट्रेसिंग असते. मेंटली खूप त्रासदायक ठरते. मला ते पार करताना आंधळा बनून ते पार करीत पाय जमिनीला टेकले की, डोळे उघड असे सांगितले होते.

**११. नवीन येणाऱ्यांना काय सांगाल?**

ओपन वॉटर इव्हेंट हा प्रकार नवीन असला तरी आपली स्कीन रफ आणि टफ आहे. त्यामुळे परदेशी खेळाडूंपेक्षा आपल्याला त्रास कमी होतो. त्याचा पण उपयोग केला पाहिजे. करिअरचा विचार केला तर स्विमिंग तुम्हाला पुढे घेऊन जाईलच, पण तुम्हाला शिक्षणही गरजेचे आहे. दोन्हींचा बॅलेन्स ठेवायला लागेल. शिक्षण संस्थांनी अशा खेळाडूंना ओळखून त्यांना सपोर्ट केला पाहिजे. खेलो इंडियाला बढावा दिला पाहिजे. यामध्ये महाविद्यालयातील मुलांना सपोर्ट दिला आहे, पण लहान मुलांना शाळेपासून सपोर्ट गरजेचा आहे. तसे झाले तरच खेळाडू तयार होतील.

**(शब्दांकन : नितीन देशमुख)**

# स्वातंत्र्य दिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेत ध्वजारोहण

## विविध कार्यक्रम उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताच्या ७८व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त पनवेल महापालिकेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज मैदानावर गुरुवारी (दि.१५) आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या वेळी अतिरिक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त कैलास गावडे, बाबासाहेब राजळे, डॉ.वैभव विधाते, सहाय्यक संचालक रचनाकार ज्योती कवाडे, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, विरोधी पक्षनेते, माजी नगरसेवक व नगरसेविका, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, पालिका अधिकारी, सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

रायगड सुरक्षा रक्षक मंडळ, महाराष्ट्र राज्य सुरक्षा बल, पालिकेचे अग्निशमन दलाच्या जवानांनी संचलन केले, तसेच ध्वजाला मानवंदना दिली.

मुख्यालयाबरोबर महापालिकेच्या १० शाळांमध्येदेखील स्वातंत्र्य दिनानिमित्ताने ध्वजारोहणाचा कार्यक्रम करण्यात आला. यावेळी ढोल ताशाच्या तालावर विद्यार्थ्यांनी लेझीमचा फेर धरला, तसेच कोळीवाडा शाळेच्यावतीने वंदे मातरम, भारत माता की जयच्या घोषणा देत रॅली काढण्यात आली.




पनवेल : भाजप प्रदेश महासचिव तथा माजी नगरसेवक विक्रांत पाटील यांच्या जनसेवा कार्यालयासमोर स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. या ठिकाणी संस्कार भारती पनवेल महानगर महामंत्री जुईली अमित चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. या वेळी भाजप प्रदेश महासचिव विक्रांत पाटील, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील उपस्थित होते.

# फुंडे हायस्कूल येथे स्वातंत्र्य दिन साजरा

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

मंगळवारी विद्यालयात बारावी परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली प्रतीक्षा पाटील हिच्या हस्ते तर बुधवारी दहावीमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली स्नेहल रावसाहेब शिंदे हिच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. १५ ऑगस्ट रोजी विद्यालयाचे प्राचार्य एम. जी. म्हात्रे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या वेळी स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्य एम. जी. म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख व्ही. के. कुटे, सांस्कृतिक विभाग प्रमुख एच. एन. पाटील, एस. डी. म्हात्रे, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.




















रामप्रहर श्रावणधारा

## श्रावण मासी कविता सुंदर

श्रावणातला निसर्ग परिसर
कविमनाला भुलवी निरंतर
मुखी कवीच्या येती भरभर
निसर्गातल्या कविता सुंदर

श्रावणमासी क्षणात सरसर
पाउसधारा येती भूवर
क्षणात दिसते ऊन धरेवर
क्षणात फिरुनी पाण्याची सर

श्रावणमासी गीत मनोहर
भाट धरेवर गाती सुस्वर
पक्षी, प्राणी आनंदाने
विहार करती या भूमीवर

सणासणांनी दाटी केली
स्थान मिळविण्या या मासावर
ललना नटती, नटती बाला
सण साजरे करण्या सत्वर

मनमोहक या श्रावणातल्या
कविता सर्वा खूप भावती
कविता गायन करता सुस्वर
उभा ठाकतो श्रावण भवती

रम्य अशा या श्रावणमासी
कविता नटल्या सर्वांगानी
निसर्गातली घेत भूषणे
कविता सजल्या नवरंगानी



-पी.जी. ठाकूर,
पनवेल

## निवडक

### शैलेश चव्हाण शिवसेना उपजिल्हाप्रमुखपदी



**रेवदंडा** : अलिबाग तालुक्यातील शैलेश चव्हाण यांना शिवसेना उपजिल्हा प्रमुखपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते राजमळा निवासस्थानी चव्हाण यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. या वेळी जिल्हाप्रमुख राजा केणी, तालुकाप्रमुख अनंता गोंधळी, महिला जिल्हा संघटक संजिवनी नाईक, शरद गोंधळी, ॲड. मनमीत पाटील आदी उपस्थित होते. आमदार दळवी यांनी चव्हाण यांना भगवी शाल, पुष्पगुच्छ प्रदान करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### रोह्यात एमआरआय सेंटरचे उद्घाटन



**रोहे** : रोहा शहरातील डॉ. जाधव नर्सिंग होम्सच्या एमआरआय सेंटरचे उद्घाटन खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते झाले. या वेळी त्यांनी डॉ. अशोक जाधव हे सामाजिकी बांधिलकी जपत आहेत, असे मनोगतात म्हटले. या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, राष्ट्रवादीचे जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, उद्योजक बापू लिंबोरे, ॲड. सावंत, पोलीस निरीक्षक देवीदास मुपडे, डॉ. धुर्व, डॉ. अभय ससाणे, माजी उपनगराध्यक्ष महेंद्र गुजर, राजेंद्र जैन, महेश कोलाटकर, शहर अध्यक्ष अमित उकडे, समाधान शिंदे, यशवंत शिंदे, डॉ विश्वनाथ देशमुख, डॉ. अपणकर, डॉ. किणीकर, निलेश शिर्के आदी उपस्थित होते.



**माणगाव : येथील पोलीस ठाण्याच्या अस्मिता पाटील यांना सहाय्यक पोलीस निरीक्षकपदी पदोन्नती मिळाल्याबद्दल त्यांचे शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबिर सेवाभावी संस्थतर्फे अभिनंदन करण्यात आले. या वेळी सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा जाधव, शर्मिला सत्वे, शिक्षिका विनया जाधव आदी उपस्थित होत्या.**

# माणगावातील पर्यटनस्थळे पडली ओसाड

## परिसरातील स्थानिकांचा रोजगारही बुडाला

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील प्रसिद्ध असलेल्या पर्यटनस्थळांवर कोणतीही दुर्घटना घडू नये म्हणून शासनाच्या वतीने खबरदारीची उपाययोजना म्हणून माणगाव उपविभागीय दंडाधिकारी डॉ. संदीपान सानप ५ जुलै ते ३० सप्टेंबर या कालावधीसाठी कलम १४४ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत. त्यामुळे पर्यटकांनी या स्थळांकडे पाठ फिरवली असून ती ओसाड पडली आहेत. परिणामी या परिसरातील छोटे मोठे उद्योगधंदे करणाऱ्या स्थानिकांचाही रोजगार बुडाला आहे.

माणगाव तालुक्यातील रवाळजे दूरक्षेत्र अंतर्गत भिरा गावच्या हद्दीतील देवकुंड धबधबा व सणसवाडी हद्दीतील सिक्रेट पॉईंट तसेच ताम्हाणी घाट हा परिसर पावसाळी हंगामात पुणे, मुंबईसह महाराष्ट्रातील पर्यटकांच्या आकर्षणाचे ठिकाण आहे. ही ठिकाणे दुर्गम भागात असल्यामुळे तेथे कोणत्याही सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. यापूर्वी या परिसरात अनेक पर्यटक मृत्युमुखी पडल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे शासनाने जमावबंदीचा निर्णय घेतला आहे.

सिक्रेट पॉईंट या ठिकाणी सुरक्षा व्यवस्थेचा अभाव असल्याने पर्यटकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. ताम्हिणी घाट हा धोकादायक वळणांचा व तीव्र उताराचा असल्याने तसेच दरड कोसळण्याची शक्यता असल्याने पर्यटकांची वित्त व जिवीत हानी होऊ शकते. या कारणांमुळे ताम्हाणी घाटासह देवकुंड धबधबा, सिक्रेट पॉईंट व कुंभे ही पर्यटनस्थळे पर्यटकांच्या दृष्टीने सुरक्षित नसल्याने मनाई केली गेली आहे. या भागात माणगाव पोलिसांकडून बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

दरम्यान, परिसरातील छोटे मोठे हॉटेल व्यावसायिक, खानावळ, चहा व पान टपरीवाले, मकाविक्रेते, पर्यटकांच्या निवासाची सोय करणारे व्यावसायिक, फळ व भाजी विक्रेते, रिक्षावाले, परिसरातील पर्यटनस्थळाची माहिती देणारे गाईड या व्यवसायावर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला आहे. त्यामुळे आधीच सुशिक्षित बेरोजगार असणारे गाईड व व्यावसायिकांच्या कुटुंबावर ऐन हंगामात रोजगार बुडाल्याने उपासमारीची वेळ आली आहे तसेच ग्रामपंचायतच्या उत्पन्नातही पर्यायाने घट झाली आहे.



माणगाव तालुक्यातील नैसर्गिक असणाऱ्या पर्यटनस्थळांसाठी पावसाळ्यात जून ते सप्टेंबर हा चार महिन्याचा कालावधी उत्पन्नाच्या दृष्टीने महत्त्वाचा असतो. पर्यटक या स्थळांकडे इतर दिवशी फिरकत नाहीत. ऐन हंगामात कलम १४४ लागू केल्याने पर्यटकांनी येथे पाठ फिरवली आहे, तर स्थानिक व्यावसायिकांचा रोजगार बुडाला आहे.

शासनाने पर्यटनस्थळे विकसित करून पर्यटकांना सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना आखून सुविधा पुरवल्यास दुर्घटनेला आळा बसेल व स्थानिकांनाही रोजगार मिळवून तालुक्यासह जिल्ह्याच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होऊन आर्थिकदृष्ट्या सक्षमता येईल, अशी स्थानिकांची मागणी आहे.

# ‘लम्पी’मुळे मुरूडमध्ये वासराचा मृत्यू

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यात पाळीव प्राण्यांना लम्पी रोगाच्या विषाणूची मोठ्या प्रमाणात लागण झाली आहे. अशातच काही दिवसांपूर्वीच लम्पी रोगाची लागण झालेल्या वासराचा मृत्यू झाला आहे.

अनेक गावातील पाळीव प्राण्यांना शरीरावर गाठी आल्या आहेत. डॉक्टर कमी व रोगाने ग्रासलेली गुरे खूप मोठ्या प्रमाणात असल्याने बाधित जनावरांवर इलाज कसा होणार, असा प्रश्न मुरुड तालुक्यातील शेतकरीवर्गाला पडला आहे. तालुक्यात बोर्ली, नांदगाव, वळके, आगरदांडा व मुरूड शहर अशी पाच आरोग्य केंद्र आहेत, पण प्रत्यक्षात गुरांचे डॉक्टर मुरूड शहर व बोर्ली भागात आहेत. इतर ठिकाणी पाळीव प्राण्यांचे डॉक्टर नसल्याने हा रोग वेगाने पसरत आहे.

लम्पी रोग आटोक्यात आणण्यासाठी मुरुड तालुक्यात पाळीव प्राण्यांच्या डॉक्टरांची संख्या वाढवावी, अशी मागणी शेतकरी करीत आहेत. याबाबत प्रस्तुत प्रतिनिधीने मुरूड शहराचे पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. विनायक पवार यांना लम्पी रोगाबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, हा रोग आटोक्यात आला असून लसीकरणाचे काम जोरदार सुरू आहे. शेतकऱ्यांनी ज्या गोठ्यात गुरांना ठेवले जाते तो सर्वप्रथम स्वच्छ करणे खूप आवश्यक आहे.गोठ्यात माश्यांची वाढ होऊ नये यासाठी औषधाचा वापर करावा तसेच एखादे जनावर खात-पीत नसेल तर त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी या वेळी केले.




**माणगाव : सलग सुट्ट्यांमुळे मुंबई-गोवा महामार्गावर गुरुवारी सकाळी वाहनांच्या रांगा लागून वाहतूक कोंडी झाली होती.** (छाया : सलीम शेख)

# होमगार्ड लक्ष्मण आखाडे यांचे उपोषण स्थगित



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी आश्वासन दिल्यामुळे होमगार्ड लक्ष्मण आखाडे यांनी आपले आमरण पोषण स्थगित केले आहे.

होमगार्डचे कर्तव्य बजावत असताना अपघातात लक्ष्मण आखाडे यांचे दोन्ही पाय निकामी झाल्यामुळे त्यांना अपंगत्व आले. आपल्याला कायमस्वरूपी नोकरी मिळावी या मागणीसाठी आखाडे १४ ऑगस्टपासून रायगड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसले होते.


१५ ऑगस्ट रोजी महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी उपोषणस्थळी जाऊन लक्ष्मण आखाडे यांची भेट घेऊन जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांच्याशी चर्चा करून लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल, असे सांगितले.

यानंतर जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी उपोषणस्थळी जाऊन आखाडे यांची भेट घेतली व मागणीबाबत बैठक बोलावून, असे आश्वासन दिले तसेच उपोषण स्थगित करण्याची विनंती केली. त्यानंतर अलिबाग पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक भरत फार्णे यांनी पत्र व शीतपेय देऊन उपोषण स्थगित करण्यास सांगितले.

# संभाजी भिडे यांच्या उपस्थितीत शिवप्रतिष्ठानची कर्जतमध्ये बैठक

**नेरळ : प्रतिनिधी**

श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक संभाजी भिडे यांची नुकतीच कर्जत येथे धारकऱ्यांसोबत नियोजन बैठक झाली. रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचे ३२ मण सुवर्णसिंहासन बनवण्याचा संकल्प करण्यात आला आहे. याबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आली.



शिवप्रतिष्ठानचे संस्थापक संभाजी भिडे यांचे अनुयायी संपूर्ण राज्यात पसरलेले आहेत. छत्रपती शिवाजी व संभाजी महाराजांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहचवण्याच्या उद्देशाने शिवप्रतिष्ठानचे कार्य चालवले जाते. भिडे गुरूजींनी काही वर्षांपासून रायगडावर शिवरायांचे ३२ मण सुवर्णसिंहासन बनवण्याचा संकल्प केला आहे. त्यासाठी शिवप्रतिष्ठानकडून तयारी सुरू असून ती एक चळवळ म्हणून उभी राहिली आहे. या संदर्भात कर्जतच्या शेळके हॉलमध्ये नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला भाजपचे कर्जत खालापूर विधानसभा प्रमुख किरण ठाकरे हेही भिडे गुरूजींच्या स्वागतासाठी व त्यांचे विचार ऐकण्यासाठी उपस्थित होते.

संभाजी भिडे यांनी अनुयायांना हिंदुत्वाचे विचार पटवून देत छत्रपती शिवाजी व संभाजी महाराज यांचा ज्वलंत इतिहास डोळ्यासमोर आणून दिला तसेच त्यांची तत्त्वे आपण अंगीकारली पाहिजे, असे आवाहन केले.

# मुरूडच्या तन्मय शेळकेची अग्निवीर म्हणून नियुक्ती

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील राजपुरी ग्रामपंचायत हद्दीतील डोंगरीसुभा गावचा सुपुत्र तन्मय रूपेश शेळके याची भारतीय वायुसेनेच्या अग्निवीरपदी नियुक्ती झाली आहे. याबद्दल राजपुरी ग्रामपंचायत व डोंगरीसुभा यंगस्टार मंडळातर्फे तन्मयचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

तन्मय शेळके याने नॅशनल डिफेन्स अकॅडमीचा कोर्स केला होता. त्यानंतर त्याने कंबाइन डिफेन्स सर्विसेसची परीक्षा देऊन त्यामध्ये अव्वल मार्क मिळवल्यानंतर त्याची शारीरिक क्षमता चाचणी करण्यात येऊन मुलाखत घेण्यात आली. या सर्व दिव्य परीक्षा पूर्ण केल्यानंतर त्याची निवड अग्निवीर म्हणून करण्यात आली. मूळचा मुरूडमधील डोंगरी गावचा, परंतु मुंबईमध्ये राहून त्याने हे धवल यश प्राप्त केले आहे.

तन्मय याची वायुसेनेच्या अग्निवीरपदी नियुक्ती करण्यात आल्याने सरपंच सुप्रिया गिदी यांनी छोट्याशा डोंगरी सुभा गावच्या सुपुत्राची गगनभरारी घेतल्याबद्दल विशेष कौतुक केले. त्यांनी तन्मयला डोंगरीसुभा गावाचे नाव उज्वल केले, असे सांगून त्याला उत्तरोत्तर प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या. उपसरपंच इस्माईल जुबेर सिद्दीकी यांनी तन्मय याचा ग्रामपंचायत स्तरावर उचित सन्मान करण्याचा मनोदय व्यक्त करून त्याला शुभेच्छा दिल्या. ग्रामपंचायत सदस्य हेमंत नाईक यांनी आपल्या प्रास्ताविकात तन्मयचे कौतुक केले.

या वेळी राजपुरी ग्रामपंचायतीचे सरपंच सुप्रिया गिदी, उपसरपंच इस्माईल जुबेर सिद्दीकी, सदस्य हेमंत नाईक, तन्मयचे आजोबा रवींद्र शेळके, आजी वर्षा शेळके, वडील रूपेश शेळके, आई रूचिता शेळके, चुलत आजोबा सुनील शेळके, कुटुंबिय तसेच यंग स्टार मंडळाचे हिराचंद्र खेऊर, जयेश भोसले, अभिजित जाधव, रूणाल नाईक, नितीन चाफीलकर, अमोल मिरजणकर, निखिल चाफीलकर, सतेज मिरजणकर, किरण शेळके, कुणाल शेळके, अमोल जाधव आदी उपस्थित होते.



# लायन्स क्लबकडून गुणवंतांचा सत्कार



**मुरूड : प्रतिनिधी**

लायन्स क्लब ऑफ अलिबाग मुरूडच्या वतीने तालुक्यातील दहावी आणि बारावीत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या तसेच लायन परिवारातील विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या एकंदर ७५ गुणवंतांचा मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. अलिबागेतील क्षात्रैक्य समाजाच्या सभागृहात हा सोहळा झाला.

या वेळी उपस्थित गुणवंत विद्यार्थ्यांना सेकंड डिस्ट्रिक्ट व्हॉइस गव्हर्नर प्रवीण सरनाईक यांनी मार्गदर्शन केले व लायन्स या सेवाभावी संस्थेच्या उपक्रमांविषयी थोडक्यात माहिती दिली.

मुरूड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांनी सोशल मीडिया, मोबाईल यापासून दूर राहून विद्यार्थ्यांनी आपल्या प्रकृतीकडेही लक्ष देण्यास सूचवले तसेच एकाग्रता वाढविण्याच्या दृष्टीने काही छोट्या टिप्स दिल्या. माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर अनिल जाधव यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले.

कार्यक्रमास अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, लायन्स क्लब गॅट कोऑर्डिनेटर अनिल म्हात्रे, रिजन चेअरपर्सन विजय वनगे, अलिबाग लायन अध्यक्ष ॲड. गौरी म्हात्रे, डायमंड अध्यक्ष डॉ. रेखा म्हात्रे, फर्स्ट व्हीपी प्रदीप नाईक, खजिनदार अंकिता म्हात्रे, अंकिता पाटील, नयन कवळे, प्रियदर्शनी पाटील, श्रुती सरनाईक, गिरीश म्हात्रे, नितीन शेडगे, अविनाश राऊळ, महेंद्र पाटील, संतोष पाटील, अभिजित पाटील, अभिजित आमले, परेश भतेजा, भगवान मालपाणी, कांतीलाल जैन, ॲड. महेश म्हात्रे, ॲड. विजय पाटील, ॲड. निवास पाटील, ॲड. के.डी. पाटील, मिलिंद मगर आदी लायन व डायमंड मेंबर्स, पालक उपस्थित होते. सूत्रसंचालन सीमा शेडगे, ईशस्तवन रमेश धनावडे यांनी केले, तर आभार सचिव महेश कवळे यांनी मानले.

